# अकृषी विद्यापीठांच्या बृहत विकास आराखडयांसाठी सर्वसाधारण निकशांबाबतचा

# अहवाल

डॉ. नरेंद्र जाधव, नवी दिल्ली ...................................... अध्यक्ष

डॉ.पंडित विद्यासागर, कुलगुरु, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सदस्य

डॉ. मुरलीधर चांदेकर, माजी प्रभारी कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली सदस्य

श्री. अनिल राव, सेवानिवृत्त प्राचार्य, (जळगाव) ....................... समन्वयक

द्वारा -
डॉ. नरेंद्र जाधव
नवी दिल्ली

दि. २६ सप्टेंबर २०१५

प्रति,
मा. ना. विनोदजी तावडे,
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

संदर्भ- महाराष्ट्र शासन निर्णय उशिप२०१४/प्र.क्र.४०३/विशी-३,दि.२०/०७/२०१५

महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त संदर्भिय निर्णयान्वये डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पुढील समिती गठीत करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. नरेंद्र जाधव, प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञ, नवी दिल्ली | अध्यक्ष |
| २. | डॉ. पंडित विद्यासागर, कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड | सदस्य |
| ३. | डॉ. मुरलीधर चांदेकर, प्रभारी कुलगुरु गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | सदस्य |
| ४. | प्राचार्य अनिल राव (सेवानिवृत्त), जळगाव | समन्वयक |

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८१(१) मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक विद्यापीठाने बृहत विकास आराखडा तयार करावयाचा असतो. असा आराखडा तयार करताना उच्च शिक्षण हे ग्रामीण, डोंगराळ, आदिवासी, नक्षलग्रस्त व शहरी इ. भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे या हेतुने संपूर्ण राज्यामध्ये शिक्षणाचे समतोल जाळे निर्माण होणे अपेक्षित आहे. तसेच अधिनियमाच्या कलम ८३(५) मध्ये "विद्यमान महाविद्यालयांमध्ये व परिसंस्थांमध्ये नवीन विषय आणि जादा तुकडी सुरु करण्यासंबंधीच्या परवानगीची कार्यपद्धती ही राज्य शासनाकडुन विहित करण्यात येईल त्या प्रमाणे असेल" अशी तरतूद आहे.

सद्य:स्थितीत विविध अ-कृषी विद्यापीठांकडून तयार करण्यात आलेल्या बृहत आराखड्यांचे अवलोकन केले असता प्रत्येक विद्यापीठाकडून वेगवेगळे निकष विचारात घेण्यात आल्याचे आढळते. वस्तुत: महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाचा बृहत आराखडा तयार करतांना सर्व ठिकाणी सर्वसाधारणपणे एकाच प्रकारचे निकष विचारात घेणे आवश्यक आहे. असे समान निकष ठरविण्या बाबत सदर समिती नेमण्यात आली आहे.

या समितीने महाराष्ट्र राज्यातील अ-कृषी विद्यापीठांकडून तयार होणाऱ्या बृहत विकास आराखड्याबाबतचे वापरलेले निकष संकलीत केले आहेत. तसेच सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी सर्व विद्यापीठांकडून जिल्हा निहाय व विद्याशाखा निहाय प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या व उपलब्ध प्रवेश क्षमता या बाबत देखिल सांख्यिकी माहिती संकलित केली आहे. या समितीने सर्व अ-कृषी विद्यापीठांच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळांच्या संचालकांसमवेत सहविचार सभा आयोजित करुन बृहत विकास आराखड्या संदर्भात त्यांची मते जाणून घेतली व प्रत्येक विद्यापीठाद्वारा वापरल्या जाणाऱ्या निकषांचे ठळक मुद्दे एकत्रित केले .

जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या धोरणांचा अवलंब केल्यानंतर गेल्या दोन दशकात राष्ट्रीय स्तरावर व राज्य स्तरावर सर्व क्षेत्रात आमुलाग्र बदल अनुभवास येत आहेत. उच्चशिक्षण क्षेत्रात देखिल या अनुषंगाने गेल्या २० वर्षात अनेक बदल झालेले दिसतात. शासनाने अंगिकारलेले कायम विना अनुदानाचे धोरण, खाजगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातुन उपलब्ध झालेल्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या व्यापक सुविधा, युवकांमध्ये निर्माण झालेल्या उच्च शिक्षण विषयक वाढत्या आकांक्षा, विविध बँकांच्या माध्यमातुन मिळू शकणाऱ्या शैक्षणिक कर्जांच्या सुविधा व अशा अनुषंगिक कारणांमुळे महाराष्ट्र राज्यातील उच्चशिक्षण क्षेत्राचा संख्यात्मक विस्तार मोठ्या प्रमाणावर झालेला आढळतो व त्यामुळे उच्च शिक्षणातील सकल सहभाग गुणोत्तर Gross Enrolment Ratio वाढलेला आहे. परंतु संपूर्ण राज्याचा विचार करता अजुनही असे आढळुन येते की, राज्यातील ठराविक ठिकाणी उच्च शिक्षणाच्या सुविधा वाढल्या असुन अजूनही ग्रामीण, आदिवासी, डोंगराळ भागात अपेक्षित शैक्षणिक सुविधा निर्माण झालेल्या नाहीत. सकृतदर्शनी त्याचे महत्वाचे कारण म्हणजे शासनाचे कायम विना अनुदान तत्वाचे धोरण होय. कारण ग्रामीण, आदिवासी, डोंगराळ भागात कायम विना

अनुदान तत्वावर उच्च शिक्षणाच्या सुविधा शैक्षणिक संस्थांद्वारा निर्माण होऊ शकत नाही. अशा क्षेत्रात समाजाची उच्चशिक्षणाकरिता आवश्यक असणारी गुंतवणूक करण्याची आर्थिक क्षमता आढळत नाही.

गेल्या दोन दशकात खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये, व्यवस्थापन शास्त्र संस्था आणि व्यावसायिक अभ्यासक्रम देणाऱ्या खाजगी संस्था यांचे प्रमाण खूप वाढले आहे. परंतु अशा अभ्यासक्रमांच्या दर्जा बाबत वारंवार साशंकता व्यक्त करुनही अपेक्षित दर्जात्मक सुधारणा झालेली दिसून येत नाही. त्यामुळे अशा संस्थांमधून पदवी धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अपेक्षित संधी प्राप्त होत नाहीत. परिणामत: पदवीधर युवकांमध्ये अपेक्षित कौशल्य नसल्यामुळे व रोजगार न मिळाल्यामुळे निराशेचे वातावरण प्रकर्षाने जाणवते. या परिस्थितीत महाराष्ट्रा सारख्या प्रागतिक व पुरोगामी राज्याने उच्च शिक्षण विषयक दीर्घकालीन धोरण निश्चित करण्याच्या हेतुने या समितीची स्थापना करुन पहिले पाऊल टाकले आहे या बद्दल समिति शासनाचे अभिनंदन करित आहे.

या समितीचा अहवाल या सोबत जोडला असून राष्ट्रीय व राज्य स्तरीय समग्रलक्षी विचार समितीने केला आहे व अ-कृषी विद्यापीठांनी तयार करावयाच्या बृहत विकास आराखड्यांसाठी सर्वसाधारण निकष सुचविले आहेत. या समितीची अशी अपेक्षा आहे की, राज्य शासन या अहवालाचा सर्वंकष विचार करुन महाराष्ट्र राज्याचा उच्चशिक्षण विषयक बृहत आराखडा तयार करेल व त्यास अनुसरुन प्रत्येक अ-कृषी विद्यापीठ आपापल्या परिक्षेत्रातील वैशिष्ठ्यांनुसार बृहत विकास आराखडा तयार करेल.

महाराष्ट्र राज्याने पुढील २५ वर्षाचे उच्चशिक्षण विषयक उद्दिष्टे व धोरण निश्चित करुन ती साध्य करण्यासाठी पथदर्शि कृती आराखडा तयार करावा व या प्रक्रियेत विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, कुलगुरु, लोकनेते, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी यांचा सक्रिय सहभाग आग्रहपूर्वक करून घ्यावा. तसेच धोरणात्मक निर्णय म्हणुन दर पाच वर्षात सर्व घटकांच्या अपेक्षा व आकांक्षा जाणून घेण्यासाठी व्यापक शास्त्रीय सर्वेक्षणाची योजना अमलात आणावी.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदींनुसार व अनुषंगिक निर्गमित शासकीय निर्णयांनुसार प्रत्येक अ-कृषी विद्यापीठाने आपला बृहत विकास आराखडा सप्टेंबर २०१५ अखेर प्रसिद्ध करणे व त्यानुसार नवीन प्रस्ताव ऑक्टोबर २०१५ अखेर स्विकारणे अपेक्षित आहे.

प्राप्त परिस्थितीत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी शासनाने खास बाब म्हणून विशेष निर्णय करावा व शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पंचवार्षिक बृहत विकास आराखडा तयार करणेसाठी या समितीने सुचविलेल्या शिफारशींनुसार कार्यवाही करावी हे अधिक कालसंगत होईल असे समितीचे मत आहे.

उच्चशिक्षण विषयक महत्वाचे काम करण्यासाठी आपण या समितीस जी संधी दिली त्या बद्दल आपणास विशेष धन्यवाद. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, संचालक, उच्च व तंत्रशिक्षण पुणे, विविध विद्यापीठांचे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळांचे संचालक व विशेषत्वाने संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे या प्रक्रियेतील अनमोल सहकार्याबद्दल ही समिती विशेष धन्यवाद व्यक्त करीत आहे.

धन्यवाद.

आपले विश्वासू

(डॉ. नरेंद्र जाधव)
अध्यक्ष

(प्राचार्य अनिल राव)
समन्वयक

(डॉ.पंडित विद्यासागर)
सदस्य

(डॉ. मुरलीधर चांदेकर)
सदस्य

अकृषी विद्यापीठांच्या बृहत विकास आराखडयांसाठी
सर्वसाधारण निकषांबाबतचा

# अहवाल

# शैक्षणिक धोरणांचा आढावा

राष्ट्रीय दृष्टीकोनातून सर्वांसाठी शिक्षण हा राष्ट्र विकासाच्या संदर्भातला अपरिहार्य भाग आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा मूळ स्त्रोत आहे. विविध स्तरावर मानव विकासाचे कार्य करण्याची सर्वात मोठी शक्ती शिक्षणात आहे. त्यादृष्टीने आपल्या देशात विविध कालखंडात शिक्षण व शिक्षण पध्दतीत सुधारण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आल्याचे दिसते. उच्च शिक्षणाचा विस्ताराची धोरणे आणि विकासासाठी प्रचलित कायदयाच्या चौकटीत बृहत आराखडा तयार करावा लागतो. सर्व विद्यापीठांचे बृहत आराखडयाचे एकत्रीकरण म्हणजेच राज्याचा बृहत आराखडा होय. बृहत आराखडयामध्ये शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब पडणे आवश्यक असते. वर्तमान काळात विस्तार (EXPANSION) सहभाग (INCLUSION) आणि गुणवत्ता (EXCELLENCE) हि त्रिसूत्री शिक्षणाच्या संदर्भात अपरिहार्य आहे, असे राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या अहवालात सुध्दा नमुद करण्यात आले आहे. तर अलिकडे महाराष्ट्र राज्याने गठित केलेल्या काकोडकर समितीने A3 (Anyone, Anytime and Anywhere) चा आग्रह धरल्याचे दिसुन येते. त्यामुळे बृहत आराखडयात शिक्षणाचा केवळ एकांगी विचार करुन चालणार नाही तर General Enrollment Ratio वाढविण्यापासून तर कौशल्य युक्त विद्यार्थी घडविण्यापर्यंत सर्व टप्प्यांचा विचार करणे आवश्यक आहे अन्यथा तो शिक्षणाचा सर्वांगीण विकास न राहता शिक्षणाची झालेली एकांगी वाढ होईल. गुणवत्तापुर्ण शिक्षणावर समाजाचा विकास अवलंबुन असल्यामुळे शिक्षण विषयक धोरणांचा सर्वांगीण विचार करणे अत्यंत मोलाचे आहे. उच्च शिक्षणातील विस्तार, सहभाग आणि गुणवत्ता या मुद्यांवर गांभीर्याने चर्चा केली जाते. गुणवत्तेवर आधारीत शिक्षणाच्या प्रक्रियेत महाराष्ट्र राज्य नेहमीच अग्रेसर राहिले आहे. त्यादृष्टीने या देशामध्ये अनेक कमिशन, समित्या किंवा मंडळाचे गठन करण्यात आले आहे. पुनःश्च काळाची गरज ओळखून महाराष्ट्र सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाने "राज्यस्तरीय उच्च शिक्षणाचा बृहत आराखडा" या समितीचे गठन करुन उच्च शिक्षणातील महाराष्ट्र राज्याची जागरुकता पुन्हा एकदा सिध्द केली आहे. उच्च शिक्षणातील पदवीधारक हे कुशल असणे गरजेचे जसे आहे तसेच ते समाजाभिमुख सुध्दा असणे जरुरीचे आहे.

१९३५ मध्ये मेकॉले यांच्या प्रस्तावातील शैक्षणिक विकासाची कल्पना संपूर्णतः ब्रिटीश शासनाला उपयोगी व भारतामध्ये कारकुनांची जमात निर्माण करणारी होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच १९४८ मध्ये उच्च शिक्षणावर पहिले University Education Commission डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली गठित केले. त्यानंतर मुदलियार समिती (१९५२) आणि कोठारी कमिशन (१९६४) चे गठन भारत सरकारने केले. स्वातंत्र्यानंतर गठित झालेल्या या आयोगांनी उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

## राष्ट्रीय धोरण, १९६८ (The National Policy, 1968) :

१९६८ च्या राष्ट्रीय धोरणांमध्ये पुढील महत्वपूर्ण धोरणांचा विचार करण्यात आला. त्यामध्ये राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, शिक्षणाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण पध्दतीची पुनर्रचना, मुल्यशिक्षण, शिक्षण आणि जीवन यातील संबंध आणि तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर इ. रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी ग्रामीण भागांपर्यंत भौतिक सुविधा आणि कौशल्यपूर्ण शिक्षण उपलब्ध करणे आवश्यक असल्याचे या धोरणामध्ये सुचित केल्याचे दिसते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ (National Education Policy 1986)

श्री. आचार्य राममुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली गठित झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ (National Education Policy 1986) चा अहवाल १९९० मध्ये सादर केला. या शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणातील सर्वसमावेशकता व तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्यात आला. परंतु CABE च्या विनंतीनुसार १९९१ मध्ये या अहवालावर पुनर्विचार करण्यासाठी श्री. एन. जनार्दन रेडडी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन केले त्यांनी आपला अहवाल जानेवारी १९९२ मध्ये सादर केला.

जागतिकीकरणानंतर शिक्षणाचे स्वरुप व निकष यामध्ये झालेल्या बदलांना समर्थपणे तोंड देण्यासाठी पुढील उपाययोजना केल्याचे दिसते.

- त्रयस्थ गुणवत्ता आश्वस्त एजन्सीची स्थापना (१९९०) (External Quality Assurance Cell)
- राष्ट्रीय मूल्यांकन एवं मानांकन परिषदेची स्थापना (१९९४) (Nãtional Assessment and Accreditation Council)
- राष्ट्रीय मानांकन परिषदेची स्थापना (१९९४) (Nãtional Board of Accreditation)
- अंतर्गत गुणवत्ता वांढीसाठी IQAC या संकल्पनेची स्वीकृती (२००५) (Internal Quality Assurance Cell)
- राष्ट्रीय ज्ञान आयोग (२००५) (Nãtional Knowledge Commission)
- डॉ. यशपाल समिती (२००८)
- राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) (२०१३) (RUSA)
- महाराष्ट्र राज्यः डॉ. काकोडकर समिती, डॉ. निगवेकर समिती आणि डॉ. ताकवले समिती. (२०११)
- नवीन शैक्षणिक धोरण (२०१५)

## राष्ट्रीय ज्ञान आयोग (२००५)

मा. पंतप्रधानांचे उच्चस्तरीय सल्लागार म्हणून कार्य करण्यासाठी श्री. सॅम पित्रोडा हयांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे गठन भारत सरकारने केले. भारतभूमी ही "ज्ञान भूमी" (Knowledge Landscape) असे मानून शैक्षणिक केंद्राची (Educational Hub) निर्मिती करणे ही सॅम पित्रोडा यांनी केलेल्या ३०० शिफारसींद्वारा प्रामुख्याने विस्तार (EXPANSION) सहभाग (INCLUSION) आणि गुणवत्ता (EXCELLENCE) ही उदि्ष्टे सुचित केली आहेत. विस्तारामध्ये विद्यापीठांच्या संख्येत वाढ, ५० राष्ट्रीय विद्यापीठांची निर्मिती तर सहभाग आणि शिक्षणातील गुणवत्ता या संदर्भात देखील मोलाच्या सुचना केल्या आहेत. परंतु अद्यापही राज्य व केंद्र सरकारकडे निर्णय प्रक्रियेत प्रलंबित आहेत.

## डॉ. यशपाल समिती (२००८) :

राष्ट्रीय ज्ञान आयोगानंतर शिक्षणाचे नुतनीकरण करण्यासाठी व शिक्षणक्षेत्राला नवसंजीवनी मिळण्यासाठी डॉ. यशपाल समिती (२००८) चे गठन करण्यात आले. ९४ पानांच्या सादर केलेल्या अहवालामध्ये त्यांनी प्रामुख्याने प्रत्येक विद्यापीठात शिक्षणाच्या बरोबरीने संशोधन कार्याची जोड असणे अनिवार्य केले पाहिजे व त्यासाठी सर्व संशोधन कार्य करणा–या व्यक्तीला किंवा संस्थेला विद्यापीठासोबत जोडले गेले पाहिजे तसेच त्याचप्रमाणे विद्यापीठात सर्व शाखांचा समावेश आवश्यक आहे असे सूचित केले आहे.

## राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (२०१३) (RUSA)

मानव संसाधन व विकास मंत्रालय, भारत सरकारने शिक्षणाचा विस्तार व गुणवत्ता वाढीसाठी राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान सुरु केले आहे. २००७ मध्ये सर्वात कमी १५ टक्के GER हा भारताचा होता आणि सर्वात जास्त ८३ टक्के GER हा युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेचा असल्याचे युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेच्या अहवालात नमुद केले आहे. महाराष्ट्र राज्याचा GER २३.६० टक्के असून गोवा राज्याचा सर्वात जास्त GER ५०.३० टक्के असल्याचे लक्षात येते. संशोधनात तर भारताचे प्रमाण फक्त २.३ टक्के आहे तर सर्वात जास्त युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेचे २३.२० टक्के असल्याचा उल्लेख या अहवालात आहे. त्यामुळे शिक्षणाचा विस्तार आणि त्यातील गुणवत्ता या दोन्ही महत्वाच्या विषयावर रुसाने प्रकाश टाकल्याचे दिसून येते.

## नवीन शैक्षणिक धोरण (२०१५) (New Education Policy 2015)

केंद्रात नवीन सरकार रुढ झाल्यानंतर नवीन शैक्षणिक धोरण निश्चित करण्यासाठी २०१५ मध्ये कमिटीचे गठन करण्यात आले. राज्य विद्यापीठांना सक्षम करणे, शिक्षणामध्ये कौशल्य

विकासाला सम्मिलित करणे, शिक्षणातील विषमता दूर करुन शिक्षणाला समाजाभिमुख करणे, संशोधन कार्याला प्रोत्साहित करणे असे अनेक मुददे विचारार्थ आहेत.

## डॉ. काकोडकर समिती, डॉ.निगवेकर समिती आणि डॉ. ताकवले समिती (२०११)

डॉ. काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली HIGHER EDUCATION IN MAHARASHTRA या समितीचे गठन २०१० मध्ये महाराष्ट्र सरकारने केले. त्यांनी शिक्षण विषयक सर्व बाबींचा अभ्यास करुन अनेक महत्वाच्या उपाय योजना या अहवालात सूचित केल्या आहेत. डॉ. काकोडकर यांनी आपल्या अहवालात स्पर्धात्मक जागतिकीकरणात होणारी आर्थिक वाढ, ज्ञानाचे वाढणारे महत्व हे लक्षात घेता रचनात्मक विकासासाठी तरुणांना सक्षम करणे ही महत्वाची गरज आहे असे नमूद करुन A3 (Anyone, Anytime and Anywhere) हे सूत्र सुचविले आहे.

डॉ. राधाकृष्णन समिती, मुदलियार समिती व कोठारी समितीने सादर केलेल्या अहवालांनुसार शिक्षणाला समाजाभिमुख करणे, मूल्य शिक्षण, शिक्षण पध्दतीतील सुधारणा, परीक्षा पद्धतीत सुधारणा व तत्सम मुद्यांवर प्रामुख्याने भर देण्यात आला होता. परंतु जागतिकीकरणानंतर गठित झालेल्या समित्यांनी शिक्षणाच्या विस्तारासोबत सर्वसमावेशक शिक्षण देण्याचा आग्रह धरला आहे. सॅम पित्रोडा यांनी राष्ट्रीय ज्ञान आयोग (२००५)च्या अहवालामध्ये शिक्षणातील उत्कृष्टतेवर भर दिला आहे. २०१०मध्ये महाराष्ट्र राज्याने शिक्षणातील गुणवत्ता या विषयासाठी डॉ. काकोडकर समितीचे गठन केले.

या शैक्षणिक विकासाच्या शृंखलेत एक महत्वाची कडी जोडण्याचे महत्वाचे कार्य महाराष्ट्र सरकारने केले आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करुन आतापर्यंत विविध समित्यांनी सुचविलेल्या उपाययोजना व महाराष्ट्र राज्यातील वास्तविकता यांची सांगड घालून विद्यापीठांच्या बृहत विकास आराखडयांचे निकष सुचविण्याचे महत्त्वाचे कार्य या समितीकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

राष्ट्रीयं आणि राज्यस्तरावर १९४८ पासून तर २०१५ पर्यंत विविध आयोग, समित्या आणि मंडळांच्या माध्यमातून उच्च शिक्षणासंबंधित विविध बाजूंनी प्रयत्न केल्याचे निदर्शनास येत असले तरी उच्च शिक्षणाबददलचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी प्रथमच राज्य शासनाने घेतलेला पुढाकार ही स्तुत्य बाब आहे.

# बृहत विकास आराखडयाची व्यापक उद्दिष्टे

उच्च शिक्षणाचे नियोजन आणि अंमलबजावण करण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्यात येतो. या आराखडयाचे उद्दिष्ट, उच्च शिक्षणाची उपलब्धता योग्या त्या ठिकाणी आणि तेथील गरजेनुसार करणे आहे, असे साधारणपणे मानले जाते. मात्र बृहत आराखडयाची उद्दिष्टे हे त्याहून अधिक व्यापक याची इथे दखल घ्यायला हवी. उच्च शिक्षणाच्या विकासासाठी उपलब्धता, समान संधी आणि गुणवत्ता या त्रिसुत्रीचा प्रामुख्याने आधार घेतला जातो. मात्र केवळ उच्च शिक्षणाची उपलब्धता करण्यावर भर दिल्यास इतर उद्दिष्टांची पूर्तता होणे कठीण होते. किंबहुना उच्च शिक्षणाच्या उपलब्धतेसाठी नवीन महाविद्यालयीन अभ्यासक्रम आणि तुकडया यांना परवानगी देताना मुलभूत सुविधा आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यांचा विचार केला जातो. मात्र अशा मान्यताप्राप्त महाविद्यालयांचा आणि संस्थांचा विकास कसा व्हायला हवा याविषयी मात्र बृहत आराखडयात प्रतिबिंब पडलेले दिसत नाहीच. त्यामुळेच बृहत आराखडयाची मांडणी करताना या विषयीचे धोरण आणि त्याची संभाव्य अंमलबजावणी या विषयीही निर्देश देणे आवश्यक आहे. असे झाले तरच उच्च शिक्षणाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

एकविसाव्या शतकातील उच्च शिक्षणाचा विचार केला तर सर्वांगीण विकासासाठी महत्वपूर्ण बाबींची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. त्या संशोधनाचे धोरण आणि संरचना, कौशल्य विकास हा उच्च शिक्षणाचा अंगभूत भाग बनविण्यासाठीचे धोरण भविष्यात उच्च शिक्षणामुळे होणारे अपेक्षित बदल त्याप्रमाणे साध्य करावयाची उद्दिष्टे यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.

## १. संशोधनविषयक धोरण, संरचना आणि विकास

गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण हे संशोधनावर आधारित असायला हवे, अशी मान्यता आता सर्वत्र आहे. शिक्षकांच्या संशोधनामध्ये सक्रीय सहभाग असल्यास त्या विषयासंबंधी अद्ययावत माहिती, त्या विषयाचे सखोल आणि सर्वांगीण आकलन याचा विद्यार्थ्यांच्या क्षमतेमध्ये वाढ होण्यात निश्चितपणे मदत होते. संशोधनावर आधारित प्रकल्प राबविताना त्यात विद्यार्थ्यांचा सहभाग घेवून त्यांना विषयाचे सखोल ज्ञान मिळण्यास मदत होते. शिवाय विद्यार्थ्यामध्ये विषयाबद्दलची उत्सुकता निर्माण होवून त्यांचा शिक्षणातील सहभाग वाढीस लागतो. अशा प्रकारच्या सहभागातून विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता, निर्णय क्षमता, कृतिशीलता, तात्विक विचारसरणी, विश्लेषण क्षमता या आणि अशा अनेक गुणांचा विकास होतो.

संशोधनाला चालना मिळाल्याने महाविद्यालयीन वातावरण शैक्षणिक गुणवत्तेला पोषक ठरते. शिवाय शैक्षणिक बाबींना प्राधान्य मिळण्यासाठी मदत होवून शिक्षक आपला ठसा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सहजपणे उमटवू शकतो.

शैक्षणिक सुविधांमध्ये अप्रत्यक्षरित्या वाढ होवून महाविद्यालयीन विकासासाठी त्याचा उपयोग होतो. त्यामुळे बृहत आराखडयामध्ये मान्यताप्राप्त संस्थेचा विकास कशा प्रकारे व्हावा, त्या विकासाचे टप्पे काय असावेत ? त्या संस्थेच्या विकासाचे मूल्यमापनाचे निकष कोणते असावेत ? आणि त्या प्रमाणात अशा संस्थांना दिल्या जाणाऱ्या सवलती कशा असाव्यात ? याचे प्रतिबिंब बृहत आराखडयात पडणे आवश्यक आहे.

## २. कौशल्य विकास काळाची गरज

कौशल्य विकास हा उच्च शिक्षणाचा अंगभूत घटक कसा होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. एकविसाव्या शतकामध्ये भारत हा जगातील सर्वात तरूण देश असणार आहे. भारताचे सरासरी आयुर्मान चोवीस एवढे असेल. लोकसंख्येवर आधारित असणारा हा फायदा देशाच्या विकासासाठी सहाय्यभूत कसा ठरेल ? या विषयी विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळेच भारत सरकारने कौशल्य विकास हा महत्वाचा मुद्दा मानला आहे. भारतातील अधिकाधिक तरूणांना कौशल्य कसे प्रदान करता येईल या विषयी कौशल्य विकास मंत्रालयातर्फे अनेक योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. बी–व्होक पदवी अभ्यासक्रम, कम्युनिटी महाविद्यालये, त्याचप्रमाणे कौशल्य विकासांसाठी केंद्राची स्थापना, उद्योगधंदे आणि खाजगी संस्था यांचा समावेश या आणि अशा गोष्टींचा त्यात अंतर्भाव आहे. इंटर्नशिप असावी. असे असले तरी कौशल्य विकास हा केवळ एक आर्थिक घटक या स्वरूपात कार्यान्वित होताना दिसत आहे.

निवड पद्धतीवर आधारित श्रेयांकन पद्धतीचा पुरस्कार आता अनिवार्य आहे. या पद्धतीमध्ये कौशल्य विकासासाठी लागणाऱ्या घटकांचा समावेश सहजपणे करता येईल. मात्र त्याही पुढे जावून एक गोष्ट करणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे शिक्षकांचा या योजनेमधील प्रत्यक्ष सहभाग. या दृष्टीने प्रत्येक शिक्षकाने किमान एक कौशल्य अवगत करून ते विद्यार्थ्यांना द्यावे. अशी योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. असे झाल्यास पदवी शिक्षणाच्या तीन वर्षात विद्यार्थ्यांना किमान तीन कौशल्य प्राप्त होतील. ही कौशल्ये त्या त्या विषयाशी संबंधित असावीत. असे विषय ऑडिट, स्वयंअध्ययन स्वरूपाचे असावेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये कृतिशील शिक्षणाची आवड निर्माण होवून त्याचा आत्मविश्वास वाढेल. तसेच अनेक क्षेत्रामध्ये उपलब्ध असणाऱ्या नोकरीच्या संधीची त्यांना ओळख होवून त्यांच्या नोकरीच्या संधी निश्चितपणे वाढतील.

त्यासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालयामध्ये कौशल्य केंद्र स्थापना करावे लागेल. या केंद्रांच्या माध्यमातून ही योजना राबविताना शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करून कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविल्यास उच्च शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास झाल्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी आणि त्यासाठी लागणारी क्षमता प्राप्त होईल.

३. शहरी, ग्रामीण आणि आदिवासी भागासाठी विकासाचे निकष

ग्रामीण आणि आदिवासी भागांसाठी तसेच महिला महाविद्यालयांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती त्याचप्रमाणे इतर मुलभूत सुविधा या निकषांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. शहरी भागासाठी आवश्यक असणारी कायमस्वरूपी शिक्षकांची संख्या, त्याचप्रमाणे विद्यार्थी उपलब्धतेतील प्रमाण इतर मूलभूत सुविधा हे ठरविताना त्या ठिकाणचा ग्रॉस एनरोलमेंट रेशो, आर्थिक स्थिती, सामाजिक साक्षरता आणि भौगोलिक परिस्थिती याचा विचार व्हावा.

उच्च शिक्षणाचा विकास आणि त्याचे मूल्यमापन, निश्चित निकष ठरवून वाढवायला हवेत. त्यामुळे येणाऱ्या दशकात 'अ' दर्जा असणारी महाविद्यालये ग्रॉस एनरोलमेंट रेशोत झालेली वाढ, होणाऱ्या संशोधनाचा दर्जा आणि मूल्य, विद्यार्थ्यांना मिळणारे नोकरीचे प्रमाण, त्यांची गुणवत्ता, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्याचे असणारे स्थान, मूलभूत सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि इतर निकषांची पूर्तता होण्याचे प्रमाण आदी गोष्टींचा समावेश करता येईल. त्या दृष्टीने राज्याचा एकविसाव्या शतकात उच्च शिक्षणाचा आलेख कसा असायला हवा याबाबत एक रोड मॅप तयार करणे आवश्यक आहे.

## बृह्त विकास आराखडयासंदर्भातील कायदेशीर तरतुदी

- महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४च्या कलम क्र. ३६ (२), ५६ (३), ८२(१) व ८२(२) मध्ये प्रत्येक विद्यापीठाच्या बृहत विकास आराखडयासंदर्भात स्पष्ट तरतुदी असून जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत.
- कलम क्र. ३६ (२) नुसार प्रत्येक विद्यापीठाच्या 'महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळा'ने विद्यापीठ व महाविद्यालयांचा दीर्घकालीन व अल्पकालीन बृहत विकास आराखडा तयार करावयाचा असून त्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ अंतर्गत समाविष्ट केल्यानुसार विद्यापीठांची उद्दिष्टे, राष्ट्रीय व राज्यस्तरीय शैक्षणिक धोरणे यांचा विचार आधारभूत घटक म्हणून करणे अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला बृहत विकास आराखडा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, राज्य शासन व मा. कुलपती यांचेकडे दाखल करावयाचा असतो. कलम क्र. ८२ मध्ये प्रत्येक विद्यापीठाने बृहत विकास आराखडा तयार

करण्याबाबत व महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळाकडून मान्यता घेणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार विद्यापीठ परिक्षेत्रातील शैक्षणिक विकास, उच्च शिक्षणाच्या सोयी व सुविधांचे समान वितरण, अविकसित क्षेत्र व उच्च शिक्षण सुविधा नसलेल्या भौगोलिक क्षेत्राची गरज या घटकांचा प्रामुख्याने विचार करणे अपेक्षित आहे. प्रस्तावित बृहत विकास आराखडयात गरजेनुसार दरवर्षी सुधारणा करता येते.

- कलम क्र. ८२ (२) अन्वये नवीन महाविद्यालय स्थापन करण्याचा अर्ज मान्यतेसाठी विचारात घेताना असा प्रस्ताव बृहत विकास आराखडयानुसार असणे आवश्यक असते.
- कलम ५६(३)(g) व ५६ (३)(i) नुसार महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळावर राज्य शासनास व सर्व विद्यापीठास अशा प्रकारच्या शिफारशी करण्याची जबाबदारी टाकली आहे की, ज्यामुळे राज्यातील उच्च शिक्षण विषयक क्षेत्रीय असंतुलन दूर होईल आणि मागासवर्गीय समाज, ग्रामीण व आदिवासी समाज, महिला व अन्य विशेष वंचित घटकांना उच्च शिक्षण विषयक सुविधा उपलब्ध होतील. प्रत्येक विद्यापीठाचा बृहत विकास आराखडा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळाने मंजूर करावयाचा असतो.

## वस्तुस्थिती

- महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम क्र. ५६ अन्वये 'महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ' गठित केले जाते. या मंडळाने राज्याच्या उच्च शिक्षण विषयक धोरणांस व विकासास विशेष दिशा देण्याचे कार्य करणे अपेक्षित आहे. परंतु गेल्या १५ वर्षात या मंडळाच्या नियुक्त्यांमधील दिरंगाई व सभांची अनिश्चितता यामुळे हे मंडळ प्रत्यक्षात अपेक्षित मार्गदर्शन करू शकलेले नाही.

- 'महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ' सक्रिय नसल्यामुळे प्रत्येक विद्यापीठास बृहत विकास आराखडयासाठी राज्यस्तरीय मार्गदर्शक सूचना मिळत नाहीत. पर्यायाने प्रत्येक विद्यापीठ आपापल्या स्थानिक गरजा, क्षमता व कुवतीनुसार असमान बृहत विकास आराखडे तयार करीत असते.
- विद्यापीठांचे बृहत विकास आराखडे तयार करताना तात्कालिक अत्यावश्यक बाब म्हणून शासनाद्वारा निर्गमित होणाऱ्या काही निर्णयांचा विचार देखील करावा लागतो.

उदा. २००४च्या सुमारास राज्यातील समाजकार्य महाविद्यालये प्रथमच अनुदानित झाली व त्याच वेळी शासनाने आदेश निर्गमित केला की, समाजकार्य महाविद्यालयांची यानंतर गरज नसल्यामुळे पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत विद्यापीठांनी नवीन समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता देऊ नये. हा आदेश आजही लागू आहे ! बदललेल्या सामाजिक वास्तवाचे भान ठेवून आता अशी समाजकार्य महाविद्यालये स्थापन करण्याची गरज आहे. मोठया कंपन्यांना 'सामाजिक जबाबदारी' हे तत्व कायद्याने स्वीकारावे लागले असून नफ्यातील ठराविक हिस्सा समाजकार्यात खर्ची घालावा लागत आहे. त्यामुळे आता समाजकार्य महाविद्यालयांची आवश्यकता आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची अवास्तव वाढ झाल्यामुळे काही वर्षांपूर्वी नवीन शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना मान्यता न देण्याबाबत धोरण शासनाने ठरविले होते.

- प्रत्येक विद्यापीठाद्वारा बृहत विकास आराखडा तयार करताना वापरल्या जाणाऱ्या निकषांची माहिती समितीने संकलित केली असून ती या अहवालासोबत जोडली आहे. गेल्या काही वर्षातील विविध विद्यापीठांचे बदललेले बृहत विकास आराखडे तपासल्यास असे आढळून येते की, नवीन स्थापन करावयाच्या महाविद्यालयांची भौगोलिक स्थळे निर्देशित करण्याव्यतिरिक्त विशेष विकासात्मक उद्दिष्टे त्यात प्रतिबिंबित होत नाहीत. काही विद्यापीठांनी नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव स्वीकारताना अपेक्षित असलेली विस्तृत माहिती ठरविलेली आहे. त्यात प्रामुख्याने प्रस्तावित जागेपासून १५ ते २४ कि.मी. परिघातील उच्च माध्यमिक वर्गाची प्रवेश क्षमता, गत तीन वर्षांचे उच्च माध्यमिक वर्गाचे विद्याशाखानिहाय निकाल, या परिक्षेत्रातील अन्य महाविद्यालयांची प्रवेश क्षमता यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

- गत १५ वर्षात राज्य शासनाने अनेक पारंपरिक व व्यावसायिक महाविद्यालये मंजूर केली आहेत. २०००–२००१ पासून शासनाने 'कायम विना अनुदान' तत्व स्वीकारल्यामुळे अशी सर्व महाविद्यालये कायम विना अनुदान तत्वावर मंजूर करण्यात आली आहेत.

- All India Council for Technical Education, National Council for Teachers Education या सारख्या संबंधित राष्ट्रीय स्तरावरील नियामक मंडळांद्वारा महाराष्ट्र राज्यात अनेक व्यावसायिक महाविद्यालये, व्यवस्थापनशास्त्र संस्था व शिक्षणशास्त्र महाविद्यालये परस्पर मंजूर करण्यात आली. विविध न्यायालयीन निवाडयांनुसार अशा महाविद्यालयांना राज्य शासनाद्वारा मान्यता देणे बंधनकारक ठरते.

- वर उल्लेख केलेल्या कारणांमुळे महाराष्ट्र राज्यात अनेक महाविद्यालये गेल्या १५ वर्षात अस्तित्वात आहेत. परंतु अशा महाविद्यालयांची स्थानिक गरज आहे अथवा नाही याबाबत गांभिर्याने विचार केल्याचे आढळत नाही.

- कालपरत्वे अनेक कारणांमुळे काही अभ्यासक्रम कालबाह्य झाले आहेत तर मागणीच्या तुलनेत प्रवेश क्षमता अवास्तव वाढली आहे. अशा महाविद्यालयांपैकी अनेक संस्था तोकडया प्रवेशांमुळे आर्थिक दृष्टया अडचणीत आल्या आहेत. शिक्षक भरती संदर्भात शैक्षणिक अर्हता, वेतन आयोगाद्वारा निश्चित पगार व भत्ते, नियमित व कंत्राटी पध्दतीच्या नियुक्त्यांची सतत बदलणारी धोरणे व अन्य अनुषंगिक कारणांमुळे शिक्षकांची अनुपलब्धता, आवश्यक अत्याधुनिक शैक्षणिक सुविधांची वानवा निर्माण होऊन व्यावहारीक प्रश्न जटील झाले आहेत.

- महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक विद्यापीठांतर्गत काही शहरे व ठराविक शैक्षणिक संस्था याकडे विद्यार्थ्यांचा ओढा असतो. यामुळे ठराविक महाविद्यालयांमध्ये प्रवेशाकरिता झुंबड असते तर अन्य महाविद्यालये ओस पडलेली दिसतात. याचा विपरित परिणाम महाराष्ट्र राज्याच्या उच्चशिक्षण व्यवस्थेवर होत आहे.

# उच्च शिक्षण विकासाची प्रस्तावित समग्रलक्षी धोरणे/निकष:

- बृहत विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया :
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, राज्यस्तरीय शैक्षणिक धोरण, राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या शिफारशी या व अशा शिखर स्तरावर घोषित दीर्घकालीन धोरणांचा आधार घेऊन महाराष्ट्र राज्याचा दीर्घकालीन बृहत विकास आराखडा तयार करावा.
- राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा तयार करण्यासाठी राष्ट्रीय धोरणांव्यतिरिक्त विद्यापीठस्तरावरुन त्या त्या परिक्षेत्रातील वैशिष्ठयांनुसार उच्चशिक्षणाच्या गरजांबाबत शास्त्रशुध्द आकडेवारी संकलीत करावी.
- राष्ट्रीय जनगणनेचे अहवाल, राज्याच्या विविध भागातील शालेय व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गत ५ वर्षातील आकडेवारी, शालेय ते उच्च माध्यमिक शिक्षण व उच्चमाध्यमिक ते महाविद्यालयीन शिक्षण अशा संक्रमणाची टक्केवारी, राज्याचे औद्योगिक विकास धोरण, व्यापार, उद्योग, बंकीग, विमा, कृषी, सहकार, माहिती तंत्रज्ञान व अन्य क्षेत्रातील आवश्यक कौशल्यांची आकडेवारी अशा निकषांचा शास्त्रीय पध्दतीने विचार राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा तयार करताना होणे अपेक्षित आहे.
- प्रत्येक विद्यापीठाचा बृहत विकास आराखडा राज्याच्या बृहत विकास आराखडयाच्या धोरणांशी सुसंगत असावा.
- राज्याची उच्च शिक्षण विषयक धोरणे सर्व विद्यापीठांना त्यांचे बृहत आराखडे तयार करण्यासाठी पथदर्शी असावीत. म्हणून राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेत क्षेत्रीय माहिती संकलन, भौगोलिक वैशिष्ठये व त्यानुसार स्थानिक गरजा ओळखण्यासाठी "Bottom-Up" Approach चा वापर करावा. व या प्रक्रियेत सर्व विद्यापीठांना सहभागी करुन घ्यावे.
- राज्याचे पुढील २५ वर्षाचे सर्वांगिण विकासाचे धोरण आधारभुत ठेवुन राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा तयार करावा. अशा आराखडयाचा कालावधी १० वर्षाचा असावा.
- राज्यस्तरीय बृहत विकास आराखडा तयार करण्याची जबाबदारी शासनाने महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ अथवा प्रस्तावित विद्यापीठ कायद्यांतर्गत निर्माण होणाऱ्या Maharashtra Higher Education Development Council (MAHED) या प्राधिकरणाकडे सोपवावी. या प्रक्रियेत Tata Institute of Social Sciences, Indian Institute of Population Studies, National Statistical Organization, FICCI, State Institute of Education व यासारख्या अन्य ख्यातनाम संस्थांची मदत घ्यावी. तसेच राज्यस्तरावर दर १० वर्षांनी शास्त्रशुध्द सर्वेक्षण करुन त्यांचे निष्कर्ष विचारात घ्यावेत.
- प्रत्येक विद्यापीठाने राज्यस्तरीय बृहत विकास आराखडयांतर्गत धोरणे आणि निकषानुसार आपला बृहत विकास आराखडा तयार करावा. त्याकरीता आपल्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या, १८ ते २३

वयोगटातील युवकांची संख्या, उपलब्ध शैक्षणिक सुविधा, स्थानिक वैशिष्ठये, शिक्षणापासुन वंचित आदिवासी व ग्रामिण भाग, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, महिला व अपंग या वंचित घटकांच्या अपेक्षा व आकांक्षा यांचा विचार करणे आवश्यक आहे.

- ठराविक प्रकारची महाविद्यालये सुरू करण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयांचे कालपरत्वे बदललेल्या स्थितीनुसार पुनर्विलोकन करून समाजकार्य महाविद्यालयांसारखे नवीन प्रस्ताव स्वीकारावे.
- कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ही विद्यापीठे अन्य विद्यापीठांपेक्षा वेगळी असल्यामुळे त्याबाबत स्वतंत्र विचार करण्याची गरज आहे. उदा. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक द्वारा संस्कृत विषयक विविध अभ्यासक्रम चालविले जातात. संस्कृत भाषेतील विविध विषयांवरील प्राचीन साहित्य मोठया प्रमाणावर असल्यामुळे अशा साहित्याचा वापर सर्व क्षेत्रात होऊ शकतो. म्हणून मुक्त विद्यापीठाप्रमाणे या विद्यापीठाद्वारा चालविल्या जाणाऱ्या आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांसाठी राज्यातील सर्व महाविद्यालयांना संलग्नता व मान्यता मिळण्याची तरतूद असावी. तसेच सर्व विद्यापीठे व महाविद्यालये यांचेकरिता कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक या विद्यापीठाने विशेष ज्ञान स्रोत केंद्र (Knowledge Resource Centre) स्थापन करावे. हे विद्यापीठ व अन्य विद्यापीठे / महाविद्यालये यांनी संयुक्त प्रमाणपत्र / पदविका / प्रगत पदविका अभ्यासक्रमांद्वारा विशेष आंतरविद्याशाखीय शिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी.
- राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरीय बृहत विकास आरखडे तयार करताना काही दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करुन ती कालबध्द पध्दतीने साधण्याची योजना आराखड्यात असावी ती पुढीलप्रमाणे :

१. सहभाग वृध्दी :

राज्यस्तरीय विकास आराखडयात Gross Enrolment Ratio (GER) पुढील दोन दशकात ३५% साध्य व्हावा व त्यासाठी येत्या दशकातील उद्दिष्ट ३०% असावे. या उद्दिष्टानुसार प्रत्येक विद्यापीठाने आपल्या बृहत आराखडयात विस्ताराच्या योजना संमिलीत कराव्यात.

२. क्षेत्रीय संतुलन :

राज्यस्तरीय विकास आराखडयात ग्रामिण व आदिवासी भागातील अनुशेष कमी करण्यासाठी गरजेनुसार किमान १ पारंपारिक (कला, विज्ञान व वाणिज्य) व किमान १ व्यावसायिक महाविद्यालय अशा क्षेत्रात निर्माण करण्याचे उद्दिष्ट असावे व त्या अनुशंगाने संबंधित विद्यापीठाने आपल्या बृहत विकास आराखडयात तरतूद करावी. यासाठी वित्तीय सहाय्य व अन्य विशेष योजना तयार करुन शासनाने 'सकारात्मक हस्तक्षेपाचे' धोरण प्राधान्याने अंगिकारावे. व वित्तीय सहाय्य अथवा अनुदानित तत्वाचा विशेष वापर करावा.

३. महिला सबलीकरण :

- राज्यस्तरीय विकास आराखडयात मुलींच्या शिक्षण विषयक आकांक्षा पूर्ण करण्यासाठी विशेष योजना असावी. उदा. पुढील २० वर्षात तालुकास्तरावर मुलींचे किमान १ महाविद्यालय असावे, मुलींच्या वसतीगृहांची विशेष निर्मिती करावी. या अनुषंगाने प्रत्येक विद्यापीठाने बृहत आराखडयात विशेष तरतूद करावी.

४. दर्जात्मक सुधारणा :

उच्चशिक्षण क्षेत्रातील दर्जात्मक सुधारणांची उद्दिष्टे राज्यस्तरीय विकास आराखडयात आकडेवारीच्या स्वरुपात घोषित व्हावी. उदा. किमान ५० % महाविद्यालये येत्या ५ वर्षात NAAC / NBA द्वारा मूल्यांकित व मानांकित व्हावेत. किमान २५% महाविद्यालये A ग्रेड प्राप्त करणारी असावीत. यासाठी प्रत्येक विद्यापीठाने बृहत विकास आराखडयात दर्जा सुधारण्यासाठी उद्दिष्टे व कृती कार्यक्रम निश्चित करावा.

५. संशोधनाचा दर्जा व उपयोजन :

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण व्यवस्थेतून होणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधनाचा स्तर उंचावणे व स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी अशा संशोधनाची उपयोगिता वाढविणे, या उद्देशाने राज्यस्तरीय बृहत विकास आराखडयात स्थानिक वैशिष्ठयांनुसार संशोधनाची विशेष सुविधा केंद्रे निर्माण करण्याची तरतूद असावी. त्यात स्थानिक उद्योगांचा सहभाग असावा. तर विद्यापीठाच्या बृहत विकास आराखडयात अनुषंगिक तरतुदी करून याबाबत समन्वय साधला जावा.

## प्रत्येक विद्यापीठाचा बृहत विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रस्तावित सूक्ष्मदर्शी धोरणे /निकष

१. सकल सहभाग गुणोत्तर (Gross Enrolment Ratio) वृद्धी :

विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्हानिहाय १८ ते २३ वयोगटातील युवकांच्या लोकसंख्येच्या प्रचलित सहभागाचे जिल्हानिहाय प्रमाण किमान ५% वाढविण्याचे पंचवार्षिक उद्दिष्ट असावे. उपलब्ध विद्याशाखानिहाय प्रवेश क्षमता व असे उद्दिष्ट यातील फरक निश्चित करून नवीन महाविद्यालयांची स्थाने जिल्हानिहाय ठरवावीत.

२. महिला सक्षमीकरण :

जिल्हा निहाय १८ ते २३ वयोगटातील युवतींच्या लोकसंख्येच्या प्रचलित सहभागाचे प्रमाण किमान ५% ने वाढवून वंचित मुलींना महाविद्यालयीन शिक्षण प्रवाहात आणण्याचे विशेष उद्दिष्ट असावे. त्यानुसार प्रत्येक तालुक्यासाठी किमान एक महिला महाविद्यालय असावे.

३. प्रवेश क्षमता :

विद्यापीठ परिक्षेत्रातील पारंपरिक विद्याशाखानिहाय सद्यस्थितीत असलेली प्रवेश क्षमता व उच्च माध्यमिक परीक्षेतील विद्याशाखाहनिहाय निकालांचे प्रमाण यांचा एकत्रित निचार करून तालुकानिहाय तफावत निश्चित करावी व अशी तफावत भरून काढण्यासाठी नवीन महाविद्यालय / विद्याशाखा विस्तार / विद्याशाखांतर्गत तुकडी विस्तार/ विशेष विषय विस्तार विकास आराखडयात प्रस्तावित करावा. या प्रक्रियेत तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी शिक्षण, औषधनिर्माण शिक्षण, तांत्रिक पदविका शिक्षण विभागांचे संबंधित विकास आराखडे व आकडेवारी विचारात घेतली जावी. तसेच कालानुरूप काही अभ्यासक्रमांच्या मागणीतील चढउतारांचा विचार व्हावा.

४. दोन महाविद्यालयातील अंतर :

असे अंतर ठरविताना विद्यापीठ परिक्षेत्रातील भौगोलिक स्थिती, आदिवासी व डोंगराळ भाग अशा वैशिष्ठयांचा विचार आवश्यक आहे. उदा. गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रात विविध पाडे व खेडी यात लोकसंख्या विखुरलेली आहे. तर अनेक ठिकाणी प्रवासी वाहतुकीच्या सोयी व सुविधा हा घटकही महत्वाचा असतो. मुंबई व पुणे यासारख्या महानगरातील महाविद्यालयीन शिक्षणाच्या सुविधांचा विचार करताना दोन महाविद्यालयातील अंतर कमी असू शकते. सबब शहरांचे वर्गीकरण व त्यानुसार दोन महाविद्यालयातील अंतर पुढीलप्रमाणे असावे.

| शहरांचे वर्गीकरण | दोन महाविद्यालयातील अंतर |
|---|---|
| अ. महानगरे – लोकसंख्या – १५ लाखापेक्षा जास्त | ०२ कि.मी. |
| ब. महानगरपालिका – लोकसंख्या ५ लाख ते १५ लाख | ०३ कि.मी. |
| क. जिल्हयाचे ठिकाण | ०४ कि.मी. |
| ड. निम शहरी विभाग – लोकसंख्या २ लाख ते ५ लाख | ०५ कि.मी. |
| इ. ग्रामीण भाग | २० कि.मी. |
| फ. आदिवासी व डोंगराळ भाग | १० कि.मी. |

असे अंतर ठरविताना पुढील दोन पद्धतींचा वापर होऊ शकतो.

- प्रचलित महाविद्यालयाच्या स्थानास केंद्रबिंदू मानून प्रस्तावित अंतराचा परिघ.
- निम शहरी व ग्रामीण भागाकरिता तालुका अथवा अन्य महत्वाचे गाव केंद्रबिंदू मानून प्रस्तावित अंतराचा परिघ.

- दोन महाविद्यालयातील अंतराचा निकष मार्गदर्शक म्हणून वापरला जावा. तथापि, प्रत्येक विद्यापीठ परिक्षेत्रातील स्थानिक वैशिष्ठये विचारात घेऊन या निकषाबाबत लवचिकता असावी. मात्र त्याबाबत सकारण स्पष्टीकरण देणे आवश्यक असावे.

- महिला, मागासवर्गीय, आदिवासी व अल्पसंख्यांक युवकांच्या गरजा पूर्ण करण्याचे प्राथमिक उद्दिष्ट असलेल्या भागांकरिता अंतराच्या निकषाबाबत लवचिकता असावी.

- अंतरांचा निकष लावताना पारंपरिक अव्यावसायिक महाविद्यालये व व्यावसायिक महाविद्यालये असे दोन स्वतंत्र गट करावेत. अंतराचा निकष एकाच विद्याशाखेच्या दोन महाविद्यालयांसाठी लागू असावा. म्हणजेच भिन्न विद्याशाखांसाठी अशी किमान अंतराची अट लागू नसावी.

५. विद्यापीठ परिक्षेत्रातील कृषी, औद्योगिक, व्यावसायिक वैशिष्ठये :

महाराष्ट्र राज्याच्या विविधतेचा विचार केल्यास असे आढळते की, विविध विद्यापीठांच्या परिक्षेत्राची कृषी विषयक, औद्योगिक, व्यावसायिक व भौतिक वैशिष्ठये भिन्न स्वरूपाची आहेत. उदा. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर भागात लेदर इंडस्ट्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ भागात ऑटोमोबाईल क्लस्टर व फार्मा उद्योग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रात वनसंपदा व अनुषंगिक उद्योग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रात कापूस, केळी व पी.व्ही.सी.पाईप व प्लास्टिक उद्योग, कोकण विभागात अन्न प्रक्रिया उद्योग, सोलापूर भागात वस्त्रोद्योग इ. सबब प्रत्येक विद्यापीठाने आपला बृहत विकास आराखडा तयार करताना अशा व्यावसायिक वैशिष्ठयांनुसार स्थानिक कुशल मानवसंसाधनाची गरज भागविण्याच्या उद्देशाने अनुषंगिक विशेष अभ्यासक्रम, विद्याशाखा अथवा महाविद्यालये व संशोधन केंद्रे प्रस्तावित करावीत. तसेच, अशा वैशिष्ठयपूर्ण व्यवसायांसाठी विशेष कौशल्यांधारित शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था (Skill Knowledge Providers) स्थापन करण्याचा विचार करावा. यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा नियोजन मंडळ, जिल्हा उद्योजक संघटना, जिल्हा Local Bank, उद्योजक प्रतिनिधी व कृषि व वन विभाग यांचा सल्ला व मार्गदर्शन घ्यावे.

राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळाने (National Skill Development Council) देशातील सर्व जिल्हयांचा अभ्यास केला असून जिल्हानिहाय कौशल्यांची आवश्यकता व उपलब्धता याबाबत अहवाल प्रसिद्ध केले आहेत. अशा विशेष कौशल्यांबाबत आवश्यकता व उपलब्धता यातील तफावतीने विश्लेषण (Gap Analysis) करून प्रत्येक विद्यापीठाने बृहत आराखडयात विशेष तरतुदी कराव्यात. तसेच पारंपरिक अभ्यासक्रमात विशेष विषयांची कौशल्ये व व्यक्तिमत्व विकासाची कौशल्ये यांचा कालबद्ध पद्धतीने समावेश करण्याचा कृती कार्यक्रम बृहत आराखडयांमध्ये समाविष्ट असावा.

६. सद्यस्थितीतील प्रवेश क्षमता व रिक्त जागा :

शिक्षणशास्त्र महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, व्यवस्थापनशास्त्र संस्था, विधी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व जैवतंत्रज्ञान, बी.बी.ए., एम.सी.एम. यांसारख्या

अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता व प्रत्यक्ष होणारे प्रवेश याबाबत सध्या मोठया प्रमाणावर तफावत आढळते. अशी तफावत अभ्यासक्रमास असलेल्या मागणीवर अवलंबून असते. तसेच प्रचलित महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधातील त्रुटी व कमकुवत अभ्यासक्रम यामुळे देखील असते. सबब या घटकाचा साकल्याने विचार करून गत तीन वर्षात सरासरी २५% पेक्षा जास्त जागा अशा अभ्यासक्रमासाठी रिक्त असतात त्या परिसरात / शहरात नव्याने त्याच विद्याशाखेचे / अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालय बृहत विकास आराखडयात प्रस्तावित करू नये. तसेच युवकांना आकर्षित करणारी नावे देवून विशेष नाविन्य नसलेले अभ्यासक्रम तयार करण्याच्या प्रवृत्तींवर बंधने आणणे गरजेचे आहे.

७. भौगोलिक स्थान व ख्यातकीर्त संस्थांची वैशिष्ठये :

उच्च शिक्षणासाठी युवकवर्ग महाराष्ट्रातील काही नावाजलेल्या महत्वाच्या शहरांना प्राधान्य देत असतो. जसे विदर्भातील विद्यार्थी नागपूर व अमरावती शहरातील महाविद्यालयांना प्राधान्य देतात तर उर्वरित महाराष्ट्रातून अजूनही पुणे व मुंबई महानगरांकडे विद्यार्थ्यांचा ओढा असतो. तर ग्रामीण भागातील युवक जिल्हयाच्या ठिकाणी शिक्षण घेण्यास उत्सुक असतो. प्रत्येक विद्यापीठ परिक्षेत्रात काही महाविद्यालये व शैक्षणिक संस्था नावाजलेलया व ख्यातकीर्त असतात. NAAC द्वारा होणारे मानांकन, विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे दिले जाणारे कॉलेज विथ पोटॅन्शिअल फॉर एक्सलन्स सारखे दर्जाचे मानांकन व त्यामुळे अशा ठिकाणी प्रवेश प्रक्रियेवर मागणीचे प्रचंड दडपण तयार होते. तर अन्य ठिकाणी प्रवेशांची वानवा असते. सबब, अन्य महाविद्यालयांचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी कालबद्ध कृती कार्यक्रम बृहत आराखडयात असावा. शैक्षणिक अंकेक्षण (Academic Audit), NAAC मूल्यांकन याबाबत बृहत आराखडयात तरतूद असावी. सातत्यपूर्ण तपासणी, प्रशिक्षण, शैक्षणिक सुविधांतील सुधारणा यासारख्या सकारात्मक तरतुदींचा समावेश बृहत आराखडयात असावा. अन्यथा असे भौगोलिक व संस्थात्मक असंतुलन कमी होणार नाही.

८. दर्जात्मक शिक्षणाच्या प्रसरणाची सामाजिक जबाबदारी :

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात अनेक महाविद्यालये व शैक्षणिक संस्था नावलौकिक प्राप्त आहेत आणि NAAC द्वारा A ग्रेड प्राप्त केलेल्या आहेत तर विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे विविध स्वरूपाचे दर्जा मानांकन देखील मिळविलेले आहेत. अशी महाविद्यालये दर्जात्मक शिक्षणाची एकांडी बेटे म्हणून ओळखली जातात. विद्यापीठ परिक्षेत्रातील ग्रामीण व आदिवासी भागात अशा दर्जात्मक शिक्षणाची सुविधा पोहोचविण्याची सामाजिक जबाबदारी नामांकित महाविद्यालयांवर सोपविली पाहिजे. म्हणून या महाविद्यालयांच्या विद्याशाखा / तुकडया / अभ्यासक्रम विस्तारांच्या प्रस्तावात त्यांना ग्रामीण व आदिवासी भागात असा विस्तार करण्यासाठी विशेष प्रयोग म्हणून परवानगी देवुन उद्युक्त

करावे. विद्यापीठाच्या बृहत विकास आराखडयात अशी महाविद्यालयीन उपकेंद्रे Satellite Centres च्या उभारणीचा विचार व्हावा.

९. अभ्यासक्रमातील विविधता :

पारंपारिक कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांच्या महाविद्यालयांपुरता मर्यादीत विचार न करता आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम, कला व ललित कला, कौशल्याधारित अभ्यासक्रम व क्रिडा विषयक अभ्यासक्रम या सारख्या अभ्यासक्रमांची खास तरतुद बृहत विकास आराखडयात असावी. तसेच Dual Degree/Twinning Programme यांचा समावेश असावा. कोणतेही नवीन अभ्यासक्रम बृहत विकास आराखडयात संमिल्लीत करतांना Choice Based Credit System, Horizontal and Vertical Mobility Vocational Approach, कौशल्य विकास, मुबलक प्रात्यक्षिके, माहिती तंत्रज्ञानाचा पर्याप्त वापर असे घटक अविभाज्य म्हणून विचारात घ्यावेत.

१०. शैक्षणिक गुणवत्ता मूल्यमापन :

प्रस्थापित महाविद्यालयांना विस्ताराचे प्रस्ताव द्यावयाचे असल्यास त्यांची शैक्षणिक तपासणी (Academic Audit) व NAAC/NBA मूल्यांकनासारखे किमान निकष पूर्व अट म्हणून असावेत. तसेच पदवी स्तरावरील किमान २ बॅचेस पूर्ण झाल्याशिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमां करिता मान्यता देऊ नये.

११. औद्योगिक शहरातील सायंकालीन महाविद्यालये :

महाराष्ट्रातील अनेक औद्योगिक शहरातील उद्योग व्यवसायात नोकरी करण्या–या व त्याद्वारे अर्थार्जन करणा–या युवकांसाठी उच्चशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सध्या मुक्त विद्यापीठांचे अभ्यासक्रम, दूरस्थ अभ्यासक्रम, आभासी वर्ग व Online अभ्यासक्रम हे मार्ग उपलब्ध आहे. तसेच बहीस्थ विद्यार्थी म्हणुन सुध्दा विद्यार्थ्यांना संधी प्राप्त होते. परंतु औपचारीक अध्ययन–अध्यापन प्रक्रियेपासुन असे नोकरी करणारे युवक युवती वंचित राहु नये म्हणुन विद्यापीठांनी सायंकालीन महाविद्यालयांची तरतुद बृहत विकास आराखडयात करावी. प्रचलित महाविद्यालयांना काही प्रचलित अभ्यासक्रम/तुकडया सायंकालीन चालविण्याची तरतुद असावी. अशी परवानगी विद्यापीठ स्तरावर देण्याची तरतूद असावी.

१२. स्वायत्ततेचा आग्रह :

'स्वायत्ततेच्या तत्वाचा अंगिकार' या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर सर्व राज्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे प्रकर्षाने जाणवते की, महाराष्ट्रासारखे प्रगत राज्य अन्य राज्यांपेक्षा खूप मागे आहे. शैक्षणिक क्षेत्रातील प्रायोगिक क्षमता महाराष्ट्रातील शिक्षणसंस्थांकडे भरपूर असल्या तरी स्वायत्ता,

स्वयंनिर्णय व स्वयंविकास यासाठी सकारात्मक मानसिकता वृद्धींगत करण्यासाठी शासन व विद्यापीठांनी सकारात्मक नियंत्रण व शिक्षकी पदे, वेतन याबाबत आश्वस्त करण्याची गरज ही समिती अधोरेखित करीत आहे. विद्यापीठांच्या बृहत विकास आराखडयात परिक्षेत्रातील सक्षम महाविद्यालयांच्या स्वायत्ततेचा नियोजनबध्द आराखडा व कृती कार्यक्रम जाणीवपूर्वक संम्मिलीत करावा.

१३. विधी महाविद्यालयांसाठी विशेष शिफारस:

विधी विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाचे प्रत्यक्ष अवलोकन गरजेचे असते. ज्या ठिकाणी न्यायालयीन प्रक्रियेच्या अवलोकनाच्या संधी मर्यादित आहे अशा तालुक्यांच्या जागी विधी महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत. म्हणून बृहत विकास आराखडयात 'न्यायालयीन प्रक्रियेचे अवलोकन करण्याच्या मुबलक संधी' हा महत्वाचा निकष विधी महाविद्यालयांसाठी असावा.

१४. प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका, बी.व्होक. अभ्यासक्रम :

विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा विविध योजनांतर्गत असे अभ्यासक्रम महाविद्यालये व विद्यापीठांना मंजुर होत असतात. तसेच विद्यापीठ स्तरावर अनेक असे अभ्यासक्रम प्रस्तावित केले जातात. या स्वरुपाच्या अभ्यासक्रमांना संलग्नता देण्यासाठी शासकीय मान्यतेची अट हा एक व्यावहारीक व जाचक प्रश्न आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा मंजुर केल्या जाणा—या अशा अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ स्तरावरच मान्यता देण्याची तरतुद असावी.

१५. भविष्यकालीन कुशल मनुष्यबळाची गरज :

आंतरराष्ट्रीय स्तरावर असा अंदाज व्यक्त केला जात आहे की, २०२२ पर्यंत मोठया प्रमाणावर कुशल मनुष्यबळाची गरज लागणार आहे व संपूर्ण जगांस कुशल मनुष्यबळ पुरवू शकणारा भारत हा प्रमुख देश असेल, कारण त्यावेळी भारतातील तरुण लोकसंख्येचे प्रमाण अन्य प्रगत देशांपेक्षा जास्त असेल. या संधीचा फायदा घेण्यासाठी राज्यस्तरीय व विद्यापीठस्तरीय बृहत विकास आराखडयात विविध स्वरुपाच्या कौशल्य विकासाच्या संधी, योजना व शिक्षण पध्दती केंद्रस्थानी असल्या पाहिजेत. सबब सर्व पारंपारीक अभ्यासक्रमातून सुध्दा कौशल्य विकासास अविभाज्य भाग म्हणुन प्राधान्य देण्याचा कृती कार्यक्रम विकास आराखडयात असावा.

१६. संशोधन विकास आराखडा :

विद्यापीठांच्या बृहत विकास आराखडयात विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर होणा—या संशोधनाची क्षेत्रे, कक्षा, दिशा व उपयोजनमूल्य निश्चित करुन संख्यात्मक व गुणात्मक उद्दिष्टे घोषित करणे आवश्यक आहे.

१७. विकास आराखडयाची सर्वंकषता व विद्यापीठांचे उत्तरदायीत्व :

विद्यापीठांचा बृहत विकास आराखडा निव्वळ नवीन प्रस्तावित महाविद्यालयांची स्थाने ठरविण्यापुरता मर्यादीत न राहता विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांचा संख्यात्मक व गुणात्मक विस्तार, विद्यापीठ परिक्षेत्रातील उच्च शिक्षणाचा दर्जात्मक विस्तार, विद्यापीठे व महाविद्यालये यांच्या सामाजिक जबाबदारीचा आयाम या सारख्या घटकांचा शास्त्रीय पध्दतीने संख्यात्मक आलेख व पंचवार्षिक उद्दिष्टे निश्चित करणे अशा स्वरूपाचा असावा. पर्यायाने दरवर्षी ठरविलेली संख्यात्मक व गुणात्मक उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली आहेत याबाबतचा विश्लेषणात्मक स्वयंमूल्यमापन अहवाल विद्यापीठांनी प्रकाशित केला पाहिजे.

१८. विद्यापीठांची उपकेंद्रे :

बृहत विकास आराखडयात विद्यापीठांनी परिक्षेत्रातील महाविद्यालयीन युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी विद्यापीठांनी विविध ठिकाणी शैक्षणिक, प्रशासकीय व संशोधनात्मक उपकेंद्रे (Sub Campuses) निर्माण करण्याचा कालबद्ध कृती कार्यक्रम संम्मिलीत करणे अपेक्षित आहे.

१९. उद्योगक्षेत्राचा सहभाग :

मान्यताप्राप्त यशस्वी उद्योगसंस्थांनी उच्च शिक्षण, संशोधन व कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यासाठी राज्यशासन व विद्यापीठांनी योजना तयार कराव्यात. तसेच महाविद्यालये व उद्योगसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्याधारीत अभ्यासक्रमांची रचना बृहत विकास आराखडयात असावी.

२०. प्रशिक्षण :

प्रत्येक विद्यापीठाच्या बृहत विकास आराखडयात शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा कृती कार्यक्रम असावा.

२१. उद्योजकता विकास :

जिल्हास्तरावर रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकता कौशल्य विकास केंद्रे विद्यापीठांनी स्थापन करावीत व महाविद्यालयीन स्तरावर याबाबत विशेष योजना असावी. विद्यापीठ स्तरावर संयुक्त उद्योग व संशोधन संस्था व्यावसायिक स्वरूपात स्थापन करण्यासाठी विशेष योजना असावी. (Entrepreneurship Incubation Centres)

* * * * *

# सहपत्र – १

शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक उशिप २०१४/प्र.क्र.४०३/विशि–३ दि. २० जुलै, २०१५

उच्च शिक्षणाचा बृहत आराखडा तयार करताना विचारात घ्यावयाचे सर्वसाधारण निकष तयार करण्याकरीता समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: उशिप २०१४ /प्र.क्र ४०३/विशि-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ३२.
दिनांक : २० जुलै, २०१५.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ८२(२) मध्ये "विद्यापीठाच्या अधिकारितेमधील सेवारहीत आणि न्यून विकसीत क्षेत्राच्या गरजांचा योग्य तो विचार करून उच्च शिक्षणाच्या सुविधांचे समन्याय वाटप होण्याची सुनिश्चिती होईल अशा रितीने, उच्च स्तर शिक्षणाच्या शैक्षणिक विकासाकरीता परिसंस्थांची आणि महाविद्यालयांची स्थाने निश्चित करण्यासाठी विद्यापीठ एक सम्यक योजना तयार करील आणि ती राज्य शिक्षण परिषदेकडून मान्य करून घेईल." अशी तरतूद आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ८३(५) मध्ये "विद्यमान महाविद्यालयांमध्ये व परिसंस्थांमध्ये नवीन विषय आणि ज्यादा विभाग सुरू करण्यासंबंधीच्या परवानगीची कार्यपध्दती ही, राज्य शासनाकडून विहीत करण्यात येईल त्या प्रमाणे असेल." अशी तरतूद आहे.

२. उक्त तरतूदींनुसार बृहत आराखडा तयार करताना उच्च शिक्षण हे ग्रामीण, डोंगराळ, आदिवासी, नक्षलग्रस्त व शहरी इत्यादी भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याच्या हेतूने संपूर्ण राज्यामध्ये शिक्षणाचे समतोल जाळे निर्माण होणे अपेक्षित आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ८३(३)(सी) मधील तरतुदीनुसार अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय व तुकडी यासाठी संबंधित विद्यापीठ जी प्रवेश क्षमता निश्चित करेल त्या प्रवेश क्षमतेइतके विद्यार्थी त्या परिक्षेत्रात उपलब्ध होतील किंवा कसे याचा सखोल अभ्यास करून (Potential Analysis) त्या आधारे विद्यापीठ क्षेत्रामध्ये नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, विषय व नवीन तुकडी यासाठी स्थान निश्चित करून त्याचा बृहत आराखडा विद्यापीठाने तयार करणे अपेक्षित आहे.

३. वर नमूद केलेल्या तरतुदी विचारात घेऊन सद्यस्थितीत उच्च शिक्षणाचा बृहत आराखडा संबंधित विद्यापीठाकडून तयार करण्यात येतो. विविध अकृषी विद्यापीठांकडून तयार करण्यात आलेल्या बृहत आराखड्याचे अवलोकन केले असता प्रत्येक विद्यापीठांकडून वेगवेगळे निकष विचारात घेण्यात आल्याचे दिसुन आले आहे. तथापि, सदर बाबतीत राज्यातील उच्च शिक्षणाचा बृहत आराखडा तयार करताना सर्व ठिकाणी सर्वसाधारण निकष विचारात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी बृहत आराखडा तयार करताना

कोणकोणते सर्वसाधारण निकष विचारात घेण्यात यावेत, या बाबींचा अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

समितीची संरचना

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. नरेंद्र जाधव, प्रसिध्द अर्थ व शिक्षणतज्ञ | - | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य अनिल राव, (सेवानिवृत्त) | - | समन्वयक |
| ३) | डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरु (प्रभारी) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, | - | सदस्य |
| ४) | श्री. पंडित विद्यासागर, कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, | - | सदस्य |

सदर शासन निर्णयाव्दारे गठीत करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल २ महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१५०७२०१७२७४५३८०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सिध्दार्थ खरात )
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. विभागातील सर्व सहसचिव /उपसचिव, उ. व तं. शि. विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
७. श्री. नरेंद्र जाधव, प्रसिध्द अर्थ व शिक्षणतज्ञ
८. प्राचार्य अनिल राव, (सेवानिवृत्त).
९. डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरु (प्रभारी), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
१०. श्री. पंडित विद्यासागर, कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ. नांदेड.
११. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (विशि-३).

# सहपत्र — २

महाराष्ट्र राज्यातील अ—कृषी विद्यापीठांद्वारा बृहत विकास आराखडा
तयार करताना वापरले जाणारे ठळक निकष

## १) मुंबई विद्यापीठ, मुंबई

१. विद्यार्थ्यांच्या विविध अभ्यासक्रमासाठीचा जिल्हानिहाय, शाखा निहाय नाव नोंदणीचा तपशील.
२. जिल्हा / तालुक्यातील उपलब्ध असलेल्या महाविद्यालयातील अंतर
३. संबंधित जिल्हा / तालुक्यात उपलब्ध असलेले अभ्यासक्रम.
४. उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा मागील ३ वर्षाचा निकालाचा तपशील.
५. केंद्र शासन /राज्य शासन यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात मानव संसाधन निर्माण करण्याकरिता आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय संस्थाबरोबर केलेले सामंजस्य करार इत्यादी.
६. विविध संस्था / सोसायटी / ट्रस्ट / प्राचार्य यांनी नवीन महाविद्यालये / अभ्यासक्रम / तुकडी / विषय सुरु करण्याकरिता सादर केलेले समर्थनार्थ प्रस्ताव.
७. अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम/तुकडी वाढ/विषय करण्याबाबत सदर माहविद्यालयाचे नॅक मूल्यांकन, मान्यताप्राप्त प्राचार्य/शिक्षक, अभ्यासक्रम व त्यामधील विद्यार्थ्यांची नाव नोंदणी, शिक्षकांचा उत्तरपत्रिका तपासणीत असलेला सहभाग, महाविद्यालयाचे मागील ५ वर्षामधील विद्यापीठात सादर केलेले संलग्नता तसेच इतर सर्व शुल्क फी तसेच महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या तुकड्यांची संख्या.

## २) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

१. Overview of Higher Education in Maharashtra.
२. Quality of Education.
३. Historical Overview of Women's Education in Western India.
४. The Contribution of SNDT Women's University to Gender Equity through Education.
५. SNDT Women's University current scenario.
६. Interaction with stakeholders, Alumni & Parents
७. Futuristic Plans for SNDT Women's University.
८. Expansion and diversification through University Department.
९. Expansion and Diversification through affiliated colleges.
१०. Research, Consultancy, & Extension.
११. Changes in Technology and its usage.
१२. Deployment of Information and communication technologies (CTs)
१३. Human Resource Development- Student and staff Development.
१४. University overall development.

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

१. ग्रामिण परिसरात १५ कि.मी. पेक्षाकमी अंतरात त्याच विद्याशाखेच्या दोन महाविद्यालयांना शक्यतो प्रस्तावित करण्यात येऊ नये अथवा नवीन महाविद्यालय / नवीन विषयासाठी अर्जकरीत असतांना प्रस्तावित असलेल्या जुन्या महाविद्यालयांचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

२. शहरी भागात नव्याने महाविद्यालय/विद्याशाखा/विषय/तुकडी देतांना ३ कि.मी.पेक्षा कमी अंतरात प्रस्तावित करण्यात येवू नये. त्यांमुळे अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांच्या विद्यार्थी संख्येवर विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

३. शिक्षणशास्त्र महाविद्यालये, विधी माहविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, मॅनेजमेंट इन्स्टिट्युट यांना मान्यता देतांना गेल्या तीन वर्षातील त्या महविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या किती प्रमाणात आहे हे पाहून जर २५% पेक्षा जादा जागा रिक्त असल्यास अशा परिसरातमध्ये /शहरामध्ये नव्याने त्याच विद्याशाखेचे / विषयाचे महाविद्यालय प्रस्तावित करु नये.

४. ज्या महाविद्यालयामध्ये पुरेसे पात्रताधारक शिक्षक उपलब्ध नाहीत अशा विद्याशाखांमध्ये विषयामध्ये नव्याने महाविद्यालय प्रस्तावित करतांना आवश्यक ती काळजी घेण्यात यावी.

५. महाविद्यालाचा समावेश करतांना सध्याची जागतिक परिस्थिती विचारात घेता रात्र महाविद्यालये/महिला महाविद्यालये/अंध महाविद्यालये इ. चा समावेश करण्यात यावा.

६. प्रथमवर्षे बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी साठी कॅप्सुल कोर्स/ब्रीजकोर्स तयार करण्यात यावा.

७. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम, विज्ञान शिक्षण, तांत्रिक शिक्षण यांचा समावेश नवीन बृहत आराखड्यात असावा.

८. उच्च शिक्षणातील वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊनपदवी, पदव्युत्तर व काही व्यावसायिक अभ्यासक्रम दूरशिक्षण पद्धतीने अमलात आणण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तावित आराखडा तयार करण्यात यावा.

९. अॅप्लाईड आर्टस/परफॉर्मिंग आर्टस/फॅशन डिझाइन/फॅशन टेक्नॉलॉजी अशी महाविद्यालये नव्याने प्रस्तावित करण्यात यावीत.

१०. बी.एस्सी. होम सायन्स सुरु करण्यास प्राधान्याने परवानगी देण्यात यावी.

११. शासन पत्र क्र. बीएड २००९(सीआर-९०/९१)मशि- दिनांक २३ जून २००९ नुसार बी.एड महाविद्यालयांसाठी बृहत आराखड्यात शिफारस नाही. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी पुणे शहर व पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये एक-एक अध्ययन अक्षमता बी.एड महाविद्यालय देण्यात यावे.

१२. विधी महाविद्यालयासाठी बृहत आराखड्यास शिफारस नाही. यानंतर विधी महाविद्यालयांची शिफारस करतांना जेथे न्यायालय असेल तेथेच विधी महाविद्यालयाची गरजेनुसार शिफारस करावी.

१३. ज्या विद्याशाखेमध्ये मागील तीन वर्षात मान्य विद्यार्थी संख्या २५% पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत अशा विद्याशांखांना /विषयांना/जादा तुकडीसाठी मान्यता देतांना विचार करण्यात यावा.

१४. नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम देत असतांना बेसिक सायन्स/टेक्नॉलॉजी असे एकत्रिकरण करण्यात यावे. इंटिग्रेटेड महाविद्यालये असावीत. सिव्हील इंजिनिअरींग अॅटोमोबाईल्स इंजिनिअरींग /

इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग / एरोनॉटीकल इंजिनिअरींग इत्यादींचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात यावा. मॅनेजमेंट व टेक्नॉलॉजी यांचा एखत्रित विचार करण्यात यावा.

४) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१. सन २०११-१२ ते सन २०१५-१६ या पाच वर्षाच्या कालावधीत मागवावयाच्या प्रस्तावांचा बृहत आराखडा तयार करतांना विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, व सातारा या तीन जिल्ह्यातील वृत्तपत्रामधून निवेदन प्रसिद्ध करण्यात आले होते. तसेच आकाशवाणीवरुनही निवेदन देण्यात आले होते.

२. उपरोक्त ठिकाणी विद्यार्थी, शिक्षक, पालक, प्रचार्य, संस्थाचालक, लोकप्रतिनिधी अशा सर्व स्तरावरील घटकांचा समावेश करुन जिल्हानिहाय बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकामध्ये संबंधित घटकांशी चर्चा करुन नवीन महाविद्यालये, अभ्यासक्रम, विद्याशाखा इ. बाबत बृहत आराखड्यामध्ये समावेश करण्याच्या अनुषंगाने निवेदनने व सूचना स्वीकारण्यात आल्या. सदर जिल्हानिहाय समित्यांचे अहवाल केंद्रीय समितीकडे सादर केला.

३. तद्नंतर पुढील कामकाजासाठी मा. संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. जिल्हानिहाय समित्यांचा अहवाल तसेच विद्यापीठ परिक्षेत्राची भौगोलिक व आर्थिक परिस्थिती शिक्षणामध्ये कालानुरुप आवश्यक असणारे बदल, आधुनिक तंत्रज्ञान व या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन सर्व घटकांना शिक्षण प्रप्त होईल त्याचबरोबर जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी कुठेही कमी पडणार नाही या दोन्ही गोष्टीची बृहत आराखड्यामध्ये सांगड घालण्यात आली.

४. बृहत आराखडा तयार करतांनाग्रामीण भागात २४ कि.मी.परिसरात एका महाविद्यालयाचा निकष लावण्यात आला आहे.

५. तसेच अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमधील मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमता तसेच १२ वी च्या विद्यार्थ्यांची विद्याशाखानिहाय प्रवेश क्षमता विचारात घेतली जाते.

६. नवीन महाविद्यालयाचे ठिकाण निश्चित करतांना अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांच्या विद्यार्थी संख्येवर विपरीत परिणाम होणार नाही, याची शहानिशा केली जाते.

७. बृहत आराखडा तयार करतांना दुर्गम, डोंगराळ, आदिवासी, अवर्षणग्रस्त दुष्काळी व पूरग्रस्त भागांचा विचार करण्यात आला आहे.

८. तसेच ज्या ज्या भागातील वैशिष्ठ्यपूर्ण साधनसामग्रीच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने येणाऱ्या अभ्यासक्रमाचा (ग्रामीण भागातील वैशिष्ठ्यपूर्ण साधनसामग्रीच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने डेअरी टेक्नॉलजी हा अभ्यासक्रम) विचार करण्यात आला.

९. या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पंचतारांकित एम आय.डी.सी. विचारात घेता त्यासाठई आवश्यक मनुष्यबळ निर्माण करण्याच्या उद्देशाने तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या तरतूदी करण्यात आल्या.

१०. या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील साखर कारखान्यांचा विचार करुन त्यासाठी आवश्यक असणारे शुगर टेक्नॉलॉजी, अल्कोहोल अशा अभ्यासक्रमंच्या तरतूदी करण्यात आल्या.

११. कोल्हापुर जिल्ह्यातील चर्मोद्योग विचारात घेऊन लेदर टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाच्या तरतूदी करण्यात आल्या.

१२. पश्चिम सह्याद्री क्षेत्राचा विचार करुन औषधी वनस्पती लागवड प्रोत्सहानसाठी औषधनिर्माणअभ्यासक्रमाची तरतूद करण्यात आली.

१३. तसेच या अनुषंगाने वेळोवेळी प्राप्त होणारे शासन निर्णय व शासन पत्रे विचारात घेण्यात आली आहेत.

## ५) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

१. विद्या संपन्नता या सोलापूर विद्यापीठाच्या ब्रीद वाक्यानुसार या विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थी विद्येने संपन्न व्हावा व उच्चविद्याविभुषित व्हावा याचा विचार बृहत आराखडा तयार करतांना प्रामुख्याने करण्यात आळा.

२. जागतिकीकरण (Globalization) व आगामी काळातील मागणी व गरज

३. मागासलेल्या व दुर्गम क्षेत्रात महाविद्यालये सुरु करण्यासाठी तरतूद करणे.

४. पारंपारिक शिक्षणासोबतच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाचे ज्ञान मिळण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रम बृहत आराखड्यात समाविष्ठ करण्यात आले.

५. मङाविद्यालयातील अंतर व लोकसंख्या.

६. भौगोलिक स्थान व आवश्यकता.

७. बृहत आराखडा तयार करतांना काळाची व विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला.

८. विद्यापीठ कार्यक्षेत्रात बारावी पास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या.

९. सद्यस्थितीत सुरु असणारे अभ्यासक्रम, प्रवेश क्षमता व प्रवेशित विद्यार्थी व अभ्यासक्रमनिहाय रिक्त जागा.

१०. सोलापूर जिल्ह्यातील व कार्यक्षेत्रातील विविध संस्था, संघटना, प्राचार्य, प्राध्यापक, महाविद्यालय, सामाजिक संस्था यांचेकडून प्राप्त निवेदने.

११. विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूण केल्यानंतर निर्माण होणाऱ्या रोजगारांच्या संधी.

१२. संशोधन क्षेत्रात निर्माण होणाऱ्या संधी, भविष्यात निर्माण होणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धा, सामाजिक गरजा, औद्योगिक क्षेत्रातील मागणी.

१३. शैक्षणिकं विकगास सोबत सामाजिक, आर्थिक व पर्यावरण विकासाचा विचार, Disaster Management या सर्वांचा विचार बृहत आराखडा तयार करतेवेळी करण्यात आला. त्यास अनुसरुन तसे अभ्यासक्रम बृहत आराखड्यात समाविष्ठ करण्यात आले.

१४. भविष्यात तंत्रज्ञान क्षेत्रातील उपलब्ध होणाऱ्या संधी.

१५. The involvement of "Sub-committee" (enclosed) for better inclusion and representation from all sections of society is special feature of our University.

६) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

१. बृहत आराखड्यामध्ये समाविष्ठ करण्यात येणाऱ्या गावांची लोकसंख्या किमान १०००० असावी.

२. दोन गावामधील अंतर किमान १५ कि.मी. असावे.

३. महानगरपालिका किंवा नगरपालिका क्षेत्रास लोकसंख्या व गावामधील अंतर लागू राहणार नाही.

४. प्रस्तावित ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने वरिष्ठ महाविद्यालय असणे गरजेचे आहे.

५. प्रस्तावित अभ्यासक्रम रोजगाराभिमुख व नाविन्यपूर्ण असावे.

६. प्रस्तावित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांने पूर्ण केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना कोणत्या क्षेत्रामध्ये रोजगार मिळेल याबाबतचा उल्लेख असावा.

७. अभ्यासक्रमाचा कालावधी, विद्याशाखा तेच अभ्यासक्रमाचे संक्षिप्त रुप (Nominee Culture of Degree) यु.जी.सी. च्या नियमाप्रमाणे असावे.

८. औद्योगिक क्षेत्रास आवश्यक असणारा मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी प्रस्तावित अभ्यासक्रम औद्योगिक क्षेत्राशी पूरक असावा.

९. प्रस्तावित अभ्यासक्रम सेल्फ सर्पोटेड असावा म्हणजे शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही या बाबत दक्षता घेण्यात यावी.

१०. प्रस्तावित अभ्यासक्रम अथवा महाविद्यालय स्थापित करतांना डोंगराळ भागातील महाविद्यालयांना प्राधान्यक्रम देण्यात यावे.

११. प्रस्तावित अभ्यासक्रम अथवा महाविद्यालय सुरु करणारी शैक्षणिक संस्था मागासवर्गीय, आदिवासी, माहिला तसेच अल्पसंख्याक असल्यास सदरील संस्थेस महाविद्यालय मंजुरी देतांना किंवा शिफारस करतांना प्राधान्य देण्यात यावे.

१२. प्रस्तावित अभ्यासक्रम अथवा महाविद्यालय सुरु करतांना फूड टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी, कॉटन टेक्नॉलॉजी, पेपर टेक्नॉलॉजी, लेदरी टेक्नॉलॉजी, न्युट्रीशन अँन्ड डायटस, ग्राफिक डिझाईन, सायबर क्राईम, अॅनिमेशन अॅन्ड फिल्म डिझाईन, हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, ऑईल अॅन्ड पेंट टेक्नॉलॉजी, फरमेंटेशन टेक्नॉलॉजी, ड्राय लॅन्ड अॅग्रीकल्चर, कम्युनिअल हार्मनी, इलेक्ट्रॉनिक्स मेडिया, फुड सायन्स अॅन्ड क्वॉलिटी कंट्रोल, सीड टेक्नॉलॉजी, इंडस्ट्रीयल मायक्रोबायोलॉजी, यासारखे अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिल्यास आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करुन देता येईल.

१३. जिओस्पॅशियल तंत्रज्ञान, नॅनो टेक्नॉलॉजी, सायकोलॉजिकल काऊन्सलिंग, अॅग्रोबेस सायन्स, इन्फरमेंशन टेक्नॉलॉजी, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील फॉरेन्सिक सायन्स, डिजिटल मिडिया,

बी.व्होक, एम व्होक इत्यादी रोजगाराभिमुख अभ्यासक्रमसुद्धा बृहत आराखड्यामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

७) संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती

१. शारानाचे शैक्षणिक धोरण.
२. विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यातील लोकसंख्या
३. तालुक्यातील अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची संख्या
४. अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या.
५. एच.एस.सी. उत्तीर्ण विद्यार्थी संख्या.
६. विद्याशाखेनिहाय प्रवेशित विद्यार्थी सन २०१२-१३.
७. उपलब्ध असलेले पदव्युत्तर अभ्यासक्रम.
८. पदवी स्तरावरील जिल्हानिहाय उत्तीर्ण विद्यार्थी.
९. शैक्षणिक संस्थांमधील अंतर.
१०. मागासलेल्या भागाची आवश्यकता.

८) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

1. The Unit of development is construed as "Taluka" for the purpose of conventional faculties and "District" for the purposes post graduate courses and professional faculties.
2. The data so procured is tabulated Village-wise, Taluka wise and District-wise terms of sub criteria namely.
   a) Village-wise, and villages having population of more than 2000(2011 census report) and junior college.
   b) District wise, Taluk wise and Faculty -wise number of existing colleges, colleges affiliated to Gondwana University, Gadchiroli and functioning in the session 2012-13 i.e. prior to formulation of Perspective Plan are included in the Perspective Plan.
   c) Faculty-wise intake capacity of existing colleges at entry point/level.
   d) Faculty-wise number of students passing the 12th standard (H.S.S.C) examination during last three years.
   e) Geographical distance between different colleges particularly Tribal and remote areas of Gadchiroli and Chandrapur District.
   f) Necessity of courses for developing, underdeveloped and unserved regions with emphasis on socio-economical backwardness.

g) Available courses and necessity of new course in tribal, backward and rural areas.
h) Minimum and Maximum numbers of students required to make it viable and manageable.
i) District wise professional and post graduate courses available.

९) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपुर

१. संस्कृत भाषेशी निगडीत अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने नवीन महाविद्यालयांची शासनास शिफारस करतांना शासनाचे संपूर्ण निकष पूर्ण न करणाऱ्या परंतु अभ्यासक्रमाच्या दृष्टीने किमान आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध असलेल्या संस्थांचा व क्षेत्रांचा विचार बृहत आराखडा करतांना करण्यात आला.

२. वैदिक, बौध्द, जैन व अवेस्तन साहित्यातील धर्म, तत्वज्ञान व विज्ञान यांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी सुविधा असणे याबाबतचे निकषांचा बृहत आराखड्यासाठी विचार करण्यात येतो.

३. अंतर्गत शिस्तीचा अवलंब करुन जीवनसंबंधात एकात्मिकृत दृष्टीकोन ठसविण्यासाठी मार्गदर्शनपर वातावरण तयार करणे आणि भारतात जागृती व नवचैतन्य निर्माण करण्यासाठी अध्यापक वर्ग व इतर क्षेत्रामध्ये कार्यरत व्यक्तिचे मतपरिवर्तन करण्याच्या दृष्टीने त्या-त्या व्यक्ति उपलब्ध असलेल्या संस्थांचा व क्षेत्राचा विचार बृहत आराखड्यात करण्यात आला आहे.

४. भाषांतरे संस्कृत ते अन्य भाषा व अन्य भाषा ते संस्कृत करण्याचे उपक्रम पुर्ण करण्यांच्या दृष्टीने सोयी-सुविधा उपलब्ध करणे.

अभ्यासक्रमासंबंधी निकष-

संस्कृत भाषा व साहित्यामधील वैश्विक मूल्ये, विद्या व ज्ञान यांचाप्रसार करण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमाचे उद्दिष्टे ठरविण्यात येवून विविध अभ्यासक्रम तयार करण्यात येतात. संस्कृत शिकण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी मूलभूत पाठ्यक्रम तयारकरण्यात येतात. संस्कृत भाषा व साहित्य अधिक लोकप्रिय व्हावे याकरिता संभाषणात्मक संस्कृत, संस्कृतातील ज्ञान व ज्ञान भंडार, संस्कृतमधील कला व वास्तुशास्त्र, वैदिक दृष्टीकोन, आयुर्वेद व संस्कृत संगणकांची भाषा इत्यादीसारखे अभ्यासक्रम तयार करुन नवीन महाविद्यालयात सुरु करण्याचे प्रयत्न केले जातात.

१०) स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

1. While preparing the 'Perspective Plan' the Geographical Distribution of colleges (faculty wise) in four districts has been taken into consideration. Graphical representation is also given.
2. The intake capacity and admitted students for Arts, commerce, Science, Education, Computer Management, Law, Social Science, Fine Arts, Pharmacy, Engineering & Physical Education faculty in four districts has been taken into consideration, Graphical representation is also given.
3. Through this plan university would like to spread the higher education in different parts of the society as rural, tribal and remote regions.
4. In this perspective plan the un-served, under-developed areas are identified and the provision of equitable distribution of facilities for higher education in the emerging fields with market demand is made.
5. As far as possible, the conventional non-demanding courses are not proposed in the perspective plan.
6. To start new colleges in un-served and under developed regions of the four districts under university jurisdiction so as to ensure equal distribution of avenues of higher education with special emphasis on socio-economic backwardness, women and tribal students.
7. 'District' will be taken up as a 'unit for development' under which new colleges will be started at Taluka level also.

११) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

१. बृहत आराखडयातील पान क्र. ३ वरील रकाना क्रमांक २ मध्ये जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयांसाठी नमूद केलेल्या अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालय त्या त्या जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी सुरु करणेकरिता प्रस्ताव सादर करता येईल. तथापि, त्या ठिकाणी त्याच अभ्यासक्रमाचे संलग्नित महाविद्यालय नको.

२. उमवि अधिक्षेत्रातील महानगरपालिका असलेल्या स्थानासाठी नवीन महाविद्यालय सुरु करणेसाठीचा प्रस्ताव बृहत आराखड्यात दर्शविण्यात आलेल्या ठिकाणपासून १५ कि.मी. परिसरापर्यंतच्या ठिकाणी असल्यास मान्य करण्यात येईल. परंतू त्या संस्थेस जागेची अट व

पायाभुत सुविधा महानगरपालिकेऐवजी त्या त्या भागाकरिता असलेल्या निकषाप्रमाणे ला राहील.

३. उमवि अधिक्षेत्रातील नगरपालिका असलेल्या स्थानासाठी नवीन महाविद्यालय सुरु करणेसाठीच प्रस्ताव बृहत आराखडयात दर्शविण्यात आलेल्या ठिकाणापासून १० कि.मी. परिसरापर्यंतच्य ठिकाणी असल्यास मान्य करण्यात येईल. परंतृ त्या संस्थेस जागेची अट व पायाभुत सुविध नगरपालिकेऐवजी त्या त्या भागाकरिता असलेल्या निकषाप्रमाणे लागू राहतील.

४. वरील मुद्या क्र २ व ३ मध्ये नमुद केलेली महानगरपालिका/नगरपालिका असलेली स्थाः वगळता, आराखडयात नमुद केलेल्या इतर ठिकाणी नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी प्रस्ताव सादर केल्यास, तो बृहत आराखडयात दर्शविण्यात आलेल्या ठिकाणापासून ०५ कि.मी परिसरापर्यंतच्या ठिकाणी असल्यास मान्य करण्यात येईल. परंतू त्या संस्थेस जागेची अट व पायाभुत सुविधा त्या त्या भागाकरिता असलेल्या निकषाप्रमाणे लागू राहतील.

५. सदर सर्वेक्षणातून विश्लेषण करता असे प्रकर्षाने जाणवते की, प्रचलित, पारंपारिक अभ्यासक्रम जसे, बी.ए. बी.कॉम. बी.एस्सी. विद्यार्थ्यांना अपेक्षित नसुन व्यावसायाभिमुख मुल्य असलेले बी. बी.ए., बी.सी.ए. बी.बी.एम., बी.ई. एम.बी.ए. एम.बी.एम., एम.पी.एम. असे अभ्यासक्रम जाणिवपूर्वक हवे आहेत. त्यामुळे समितीचे असे मत झाले आहे की, सद्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांनी अशा व्यवसायभिमुख अभ्यासक्रमांची मागणी केल्यास त्याचा सकारात्मक विचार जरुर करावा व असे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम जाणिवपुर्वक ग्रामीण भागात विकास आराखडयात सुचवावेत.

६. या सर्वेक्षणाच्या आधारे समिती अशा निर्ष्कषाप्रत आली आहे की, वाणिज्य विद्याशाखेतील बी. कॉम. व एम.कॉम. सारख्या पारंपारिक अभ्यासक्रमांसाठी वाणिज्य विद्याशाखा असावी व बी.बी. ए. बी.सी.ए. बी.बी.एम.,एम.बी.एम., एम.पी.एम. वगैरेसारख्या अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र व्यवस्थापन शास्त्र विद्याशाखा असावी व अशा व्यवस्थापनशास्त्र विषयक अभ्यासक्रम पारंपारिक अभ्यासक्रमांसोबत प्रचलित महाविद्यालयात व प्रस्तावित महाविद्यालयात संम्मिलित व्हावेत.

७. निमशहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील आर्थिक व सामाजीक निम्नस्तरातील युवकांना आपल्या निवासी गावाजवळ अपारंपारिक व्यवसायिक अभ्यासक्रमांची प्रकर्षाने गरज भासते. किंबहुना पारंपारिक अभ्यासक्रम देखील अशा ठिकाणापर्यंत पोहोंचविणे उच्च शिक्षणातील सहभागाचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक आहे. त्यातही विशेषात्वाने निमशहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील मुलींना त्यांच्या निवासाच्या गावाजवळ शिक्षण व्यवस्था देणे गरजेचे आहे. या दृष्टीकोनातून उच्च शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी फक्त नवीन महाविद्यालये त्या त्या ठिकाणी प्रस्तावित करुन समस्या सुटणार नाहीत. कारण कायम विनाअनुदान तत्वावर परिपुर्ण शैक्षणिक सुविधा व अर्हताधारक शिक्षकवर्ग उपलब्ध करुन देणे व्यवहार्य नाही. सबब, सद्या अस्तित्वात

असलेल्या अनुदानित महाविद्यालयांनी आपल्या ३० ते ४० कि.मी. परिसरातील निमशहरी, ग्रामीण व आदिवासी भागात मान्यताप्राप्त एकुण तुकडया/विषय/अभ्यासक्रमांपैकी किमान २० टक्के तुकडया/विषय/अभ्यासक्रम शिकविण्याची सोय गरज असलेल्या ठिकाणी पुरवावी व त्यासाठी ग्रामपंचायत/प्राथमिकशाळा यांच्या माध्यमातून त्या त्या ठिकाणच्या शैक्षणिक सुविधा वापराव्यात.

१२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रथम शैक्षणिक बृहत आराखडा सन २००३—०४ साठी तयार करण्यात आला. त्या आराखडयाचा आधार कोठारी कमिशनने १९६४ मध्ये सुचविल्यानुसार होता. त्यात शिक्षणाचा आधार उत्पादक वाढ, सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मिकता, सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक मुल्यांची वाढ हा होता.

हा बृहत आराखडा सन २००८—०९ ला सुधारित करण्यात आला. हया बृहत आराखडा नॅशनल नॉलेज कमिशन २००६ आणि विदर्भ व नागपूर मध्ये येणारे मिहान व सेज प्रकल्प व त्या अनुषंगाने लागणारे मनुष्यबळ हा होता. हा आधार घेताना वाढलेली जनसंख्या व भविष्यातील औद्योगिक विकास, नवीन तंत्रज्ञान, जागतिकरण, विदेशी आणि खासगी विद्यापीठांची स्थापना, शैक्षणिक मागासलेपणा, शैक्षणिक गुणवत्ता आणि शिक्षणाचे समान संधी हा होता.

वरील बाबींचा विचार करुन बृहत आराखडा तयार करण्यात आला परंतु नागपूर विद्यापीठाचा कार्यक्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि जनसंख्या याचा विचार करुन खालील बाबी भविष्यात कार्यान्वित करण्याचे ठरविण्यात आले. उदा. महाविद्यालयाचे ई—नेटवर्किंग व तदनंतर Virtual Classroom च्या आधार घेवून शिक्षण देण्याचे ठरविण्यात आले होते. त्याचप्रमाणे Public Private Partnership द्वारे नवीन विभाग स्थापन करुन विद्यापीठाचे शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा विचार करण्यात आला होता.

वर उल्लेखित सर्व बाबींचा पुर्णपणे विचार करुन पाच वर्षात बृहत आराखडा नविन महाविद्यालये, अभ्यासक्रम, विद्याशाखा व विषय सुरु करण्यासाठी तयार करण्यात आला. हयासाठी पारंपारिक विद्याशाखांसाठी तालुका युनिट म्हणून घेण्यात आले. त्याचप्रमाणे अपारंपारिक विद्याशाखांसाठी जिल्हानिहाय बृहत आराखडा तयार करण्यात आला.

त्याचप्रमाणे शिक्षणाची गरज लक्षात घेता अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संख्या वाढीचा सुध्दा विचार करण्यात आला. हा बृहत आराखडा पाच वर्षासाठी तयार करण्यात

आला होता व त्यात ५० टक्के नवीन महाविद्यालयांची स्थापना करुन आणि उर्वरित ५० टक्के नविन अभ्यासक्रम व विद्यार्थी संख्या वाढवून ठरविण्यात आले.

त्याचप्रमाणे त्या बृहत आराखडा प्रत्येक जिल्हयात पारंपारिक विद्याशाखेचे शासकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी जिल्हानिहाय प्रावधान करण्यात आले होते.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार पाच वर्षानंतर नवीन बृहत आराखडा तयार करण्याचे प्रावधान दिल्यामुळे सन २०१४–१५ ला पुनश्च नवीन बृहत आराखडा तयार करताना वर उल्लेखित बाबींचा विचार करण्यात आलाच पण या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांची Employability आणि उद्योजिकता यावर भर देण्यात आला. त्याचप्रमाणे e-business, e-finance, e-agriculture, e-governance इत्यादी बाबींचा विचार करण्यात आला. हा बृहत आराखडा तयार करताना सन २०११ च्या तालुकानिहाय जनसंख्या, औद्योगिकरण, जिल्हानिहाय व तालुकानिहाय अस्तित्वात असलेले महाविद्यालय, विद्याशाखा निहाय, सन २०१२–१३ ची विद्यार्थी संख्या, १२ वी च्या निकाल व अस्तित्वात असलेले महाविद्यालयांमध्ये अंतर, सामाजिक व आर्थिकरित्या मागासलेपणा नवीन महाविद्यालयांच्या अस्तित्वात टिकविण्यासाठी आवश्यक असलेल्या विद्यार्थ्यांची उपलब्धता यांचा सुध्दा विचार करण्यात आला. हा बृहत आराखडयात एकाच तालुक्यात आवश्यकतेपेक्षा जास्तीचे महाविद्यालये होणार नाहीत, हयाची सुध्दा काळजी घेण्यात आली.

हया बृहत आराखडयात Skill Oriented अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्राधान्य देण्यात आला.